रविवार, ३१ जुलै २०२२
# राम प्रहर
वर्ष १५ ♦ अंक १४
www.ramprahar.com
पाने ८ ♦ किंमत ₹२ ♦ रायगड

## न्यायाची सुलभतादेखील आवश्यक -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. ३०) पहिल्या अखिल भारतीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या उद्घाटन समारंभाला उपस्थिती दर्शविली. या वेळी आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी म्हणाले की, व्यवसाय आणि राहणीमान सुलभ करण्यासोबतच न्यायाची सुलभतादेखील आवश्यक आहे. आजपासून काही दिवसांनी देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. हीच वेळ आहे आपल्या स्वातंत्र्याच्या अमृताची, त्या संकल्पांची जे येत्या २५ वर्षांत देशाला नव्या उंचीवर नेतील. देशाच्या या अमृतयात्रेत इज ऑफ डुइंग बिझनेस आणि इज ऑफ लिव्हिंगप्रमाणेच इज ऑफ जस्टिसलाही तितकेच महत्त्व आहे. या कार्यक्रमास सरन्यायाधीश एन. व्ही. रमण्णा व अन्य मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही आपले विचार मांडले.

### अंतरंग
मुख्यमंत्री शिंदेंकडेच 'धनुष्यबाण' येईल -उपमुख्यमंत्री फडणवीस/२
खालापूरजवळ बसचा अपघात; सहा प्रवासी जखमी/७
भारतीय बॅडमिंटन संघाकडून पाकिस्तानचा पाडाव/८

# ...तेव्हा राजकीय भूकंप होईल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा उद्धव ठाकरेंना इशारा

**मालेगाव : प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे यांच्याबाबत जी घटना घडली त्याचा मी साक्षीदार आहे. वेळ आल्यानंतर त्यावर भाष्य करेन. सध्या मुलाखतींचा सपाटा सुरू आहे. मी जेव्हा मुलाखत देईन तेव्हा राजकीय भूकंप होईल, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना दिला आहे. ते शनिवारी (दि. ३०) मालेगाव येथे बोलत होते.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सध्या राज्याच्या दौऱ्यावर असून मालेगावमध्ये त्यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेचा भव्य मेळावा झाला. मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर शिंदे यांचा हा पहिलाच महाराष्ट्र दौरा आहे.

मालेगाव येथे सभेत बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. अन्यायाविरोधात पेटून उठा ही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची शिकवण आहे. मी आज काही बोलणार नाही, मात्र समोरून जसे जसे तोंड उघडेल मग मलाही बोलावे लागेल. धर्मवीर आनंद दिघे यांच्याबाबतीत जी घटना घडली त्याचा मी साक्षीदार आहे, असे सूचक वक्तव्य मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी केले.

उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले की, आम्ही आमच्या कुटुंबाला वेळ दिला नाही. रात्रंदिवस शिवसेनेसाठी काम केले. या मेहनतीमधून शिवसेना मोठी झाली. तुम्ही राष्ट्रवादी-काँग्रेससोबत सत्ता स्थापन करून मुख्यमंत्री झाले. मग हा विश्वासघात, गद्दारी कोणी आम्ही केली की तुम्ही केली? धर्मवीर सिनेमा काही लोकांना रूचला नाही, पचला नाही. मी आज जाहीरपणे बोलणार नाही. आता ज्या मुलाखतींचा सपाटा चालू आहे त्यावरही मी बोलणार नाही, मात्र ज्या दिवशी माझी मुलाखत होईल त्या वेळी भूकंप होईल.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, आम्ही गद्दारी केली असती तर राज्यभरातून समर्थन मिळाले नसते. राज्यातून आम्हाला समर्थन का मिळते याचा विचार तुम्ही करा. आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांच्या विचारांवर पुढे जात आहोत. शिवसेना-भाजप युतीचे सरकार आले आहे. त्यामुळे राज्याला विकासनिधी कमी पडू देणार नाही.

# पारंपरिक औषधी पद्धतींचा मानवी जीवनावर प्रभाव

## केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांचे प्रतिपादन | खारघरमध्ये आयुष संकुल इमारतीचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय पारंपरिक औषधी पद्धती अनेक शतकांपासून मानवी जीवनाच्या समृद्धीवर त्यांचा प्रभाव सिद्ध करीत आहेत. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबतच औषधाच्या या शाखेचे फायदे समाविष्ट करण्याची कल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुढे आणली होती, असे प्रतिपादन केंद्रीय आयुषमंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी शनिवारी (दि. ३०) खारघर येथे केले. त्यांच्या हस्ते आयुष बिल्डिंग कॉम्प्लेक्सचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आयुष मंत्रालय होमिओपॅथी सल्लागार डॉ. संगीता दुग्गल, राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाचे अध्यक्ष डॉ. अनिल खुराना, आयुषचे संचालक डॉ. राज मनचंदा उपस्थित होते.

खारघर येथील आयुष संकुलाच्या इमारतीमध्ये होमिओपॅथीसाठी प्रादेशिक संशोधन संस्था (आरआरआयएच) आणि आणि युनानी औषधींसाठी प्रादेशिक संशोधन संस्था (आरआरआययूएम) दोन्ही संस्था स्थित असतील. या वास्तूची पायाभरणी २८ डिसेंबर २०१५ रोजी करण्यात आली. सिडकोने ही तीन मजली संकुल इमारत ५८६० चौरस मीटरच्या बांधकाम क्षेत्रासह १९९९.८२ चौरस मीटरच्या भूखंडावर बांधली आहे.

या वेळी केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल म्हणाले की, आरआरआयएच आणि आरआरआययूएम या दोन संस्थांना अनुक्रमे ॲलर्जिक डिसऑर्डर आणि रेजिमेंटल थेरपीसाठी उत्कृष्ट केंद्र बनवण्याचा आमचा मानस आहे. आयुष मंत्रालयाच्या आदेशानुसार या दिशेने कामास आधीच सुरुवात झाली आहे.

या संस्था बालरोग, वृद्ध आणि सामान्य लोकांसाठी रुटीन हेमॅटोलॉजिकल आणि बायोकेमिस्ट्रीसाठी रुग्ण सल्ला, औषधे व प्रयोगशाळेची सुविधा प्रदान करतील आणि अनुक्रमे होमिओपॅथी व युनानीचे स्वतंत्र प्रभारी यांच्या नेतृत्वाखालील आहेत. आरआरआयएच आणि आरआरआययूएम लवकरच ॲलर्जीक विकारांसाठी होमिओपॅथी संस्था म्हणून आणि इलाज-बिट-तदबीर म्हणजेच रेजिमेंटल थेरपीचे उत्कृष्ट केंद्र म्हणून विकसित केले जातील असा प्रस्ताव आहे, असेही ना. सोनोवाल यांनी सांगितले. (पान २ वर..)

# शिवसेना नेते संजय राऊतांची महिलेला शिवीगाळ?

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेना खासदार संजय राऊत यांची एक कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या ऑडिओ क्लिपमध्ये राऊत हे एका महिलेशी आक्षेपार्ह भाषेत बोलताना ऐकू येत आहे. त्यामुळे त्यांच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे आहेत.

### ऑडिओ क्लिप व्हायरल



खासदार संजय राऊत यांची ७० सेकंदांचा ऑडिओ असलेली ही क्लिप असून त्यात एक महिला आणि राऊत यांचा संवाद सुरू आहे. या क्लिपच्या शेवटी राऊत यांनी महिलेला जमिनीची कागदपत्रे देण्यास सांगितले असून आक्षेपार्ह भाषा वापरली आहे.

ऑडिओ क्लिप समोर आल्यानंतर संजय राऊत यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. यापूर्वीही अनेकदा राऊत यांनी माध्यमांसमोर आक्षेपार्ह भाषेचा वापर केला आहे. भाजप नेते किरीट सोमय्या यांच्यावर टीका करतानाही राऊत यांनी आक्षेपार्ह भाषा वापरली होती, तर अभिनेत्री कंगना रानौत हिच्यावर टीका करतानाही आक्षेपार्ह शब्द वापरले होते.

# अर्जुन खोतकर अखेर शिंदे गटात दाखल

**जालना : प्रतिनिधी**



मी शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा देत असून शिंदे गटासोबत जात आहे, अशी घोषणा शिवसेना नेते, माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी शनिवारी (दि. ३०) येथे पत्रकार परिषदेत दिली.

खोतकर हे शिवसेना सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसोबत जातील, अशी चर्चा होती. त्यावर अखेर शिक्कामोर्तब झाले आहे. उद्धव ठाकरे यांना कल्पना देऊन शिंदे गटात दाखल होत असल्याचे खोतकर यांनी या वेळी सांगितले.

## निवडक

### सांगलीतील शाळेत हातबॉम्ब आढळल्याने खळबळ

**सांगली** : जत तालुक्यातील कुडनूर येथील शाळेत हातबॉम्ब (हॅण्ड ग्रेनेड) आढळल्याने खळबळ उडालीय. विद्यार्थ्यांना वर्गखोलीत हा बॉम्ब आढळून आला. याबाबत विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांना माहिती दिली. त्यांनी पोलिसांना कळवल्यानंतर पोलीस पथक व बॉम्ब शोधक व नाशक पथक शाळेत दाखल झाले. त्यांनी पुढील कार्यवाही पार पाडली.

### दहीहंडीनिमित्त राज्यात सार्वजनिक सुटी जाहीर

**मुंबई** : कोरोना संसर्ग कमी झाल्यामुळे यंदा सर्व सण जल्लोषात साजरे केले जाणार आहेत. त्यासाठी यापूर्वीच राज्य सरकारने सर्व निर्बंध मागे घेतले आहेत. दरम्यान, आता दहीहंडीनिमित्त राज्यात सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. तसे परिपत्रक शासनाकडून काढण्यात आले आहे.

## राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने खाते उघडले

# वेटलिफ्टींगमध्ये महाराष्ट्राच्या संकेत सरगरला रौप्यपदक



**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

बर्मिंगहॅम येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत महाराष्ट्रातील सांगलीच्या संकेत सरगरने रौप्यपदक पटकावित भारताचे पदकांचे खाते उघडले आहे. वेटलिफ्टींगमध्ये ५५ किलो वजनी गटात संकेतने एकूण २४८ किलो वजन उचलून रौप्यपदक जिंकले.

संकेतने पहिल्या फेरीत स्नॅच या प्रकारात ११३ किलो वजन उचलले, तर दुसऱ्या फेरीत क्लीन ॲण्ड जर्कमध्ये १३५ किलो वजन उचलत रौप्यपदकावर आपले नाव कोरले आहे, मात्र दुसऱ्या फेरीदरम्यान संकेत जखमी झाल्याने त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

### गुरूराजा पुजारीला 'कांस्य'



संकेत सरगरनंतर भारतीय वेटलिफ्टर गुरूराजा पुजारी याने राष्ट्रकुल स्पर्धेत ६१ किलो वजनी गटात कांस्यपदक जिंकले आहे. कर्नाटकच्या उडीपी जिल्ह्यातील पुजारीने २६९ किलो वजन उचलून पदक जिंकले. त्याने स्नॅचमध्ये ११८ किलो आणि क्लीन ॲण्ड जर्कमध्ये १५१ किलो वजन उचलले.

# महाराष्ट्राच्या उभारणीत मराठी माणसाचे योगदान सर्वाधिक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आपल्या वक्तव्यासंदर्भात निवेदन जारी करीत भूमिका स्पष्ट केलीय. यात त्यांनी महाराष्ट्राच्या उभारणीत मराठी माणसाच्या कष्टाचे योगदान सर्वाधिक असल्याचे म्हटले आहे.

राज्यपाल कोश्यारी यांनी म्हटलेय की, मुंबई महाराष्ट्राचा स्वाभिमान तर आहेच. शिवाय ती देशाची आर्थिक राजधानीसुद्धा आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी माणसाच्या या भूमीत राज्यपाल म्हणून मला सेवेची संधी मिळाली याचा मला अभिमानच आहे. त्याचमुळे अतिशय अल्पावधीत मराठी भाषा अवगत करण्याचा मी प्रयत्न केला. राजस्थानी समाजाच्या कार्यक्रमात मी जे विधान केले त्यात मराठी माणसाला कमी लेखण्याचा माझा कुठलाही हेतू नव्हता. केवळ गुजराती आणि राजस्थानी मंडळांनी व्यवसायात दिलेल्या योगदानावर मी बोललो. (पान २ वर..)

### राज्यपालांचे स्पष्टीकरण



**'माझ्या वक्तव्याचा विपर्यास'**

राज्यपालांनी असेही म्हटले आहे की, नेहमीप्रमाणे माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला गेला. अलीकडे प्रत्येक बाबतीत राजकीय चष्म्यातून बघण्याची दृष्टी विकसित झाली आहे, ती आपल्याला बदलावी लागेल. एका समाजाचे कौतुक हा दुसऱ्या समाजाचा अपमान कधीही नसतो. कारण नसताना राजकीय पक्षांनी त्यावर वाद निर्माण करू नये.

**राज्यपालांचे विधान वैयक्तिक आहे. त्यांच्याशी आम्ही सहमत नाही. मुंबईच्या विकासात मराठी माणसाचे योगदान कुणीही नाकारू शकत नाही. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानामुळे मुंबई महाराष्ट्राला मिळाली. मराठी माणसामुळे मुंबईला नावलौकिक प्राप्त झाला आहे.**
**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**महाराष्ट्राच्या इतिहासात आणि वाटचालीत मराठी माणसाचे कार्य, श्रेय हे सर्वाधिक आहे. राज्यपालांच्या विधानाशी आम्ही सहमत नाही. मला विश्वास आहे की, त्यांच्याही मनात मराठी माणसाबद्दल श्रद्धा आहे आणि त्यांनाही पूर्णपणे याची जाणीव आहे.**
**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेलमधील लोणिवलीत साकारली अंगणवाडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून व त्यांच्या जिल्हा वार्षिक योजना निधीतून पनवेल तालुक्यातील लोणिवली येथे नवीन अंगणवाडी उभारण्यात आली असून या अंगणवाडीचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २९) करण्यात आले.

### ग्रामस्थांनी मानले आभार

लोणिवली येथील अंगणवाडी जीर्ण झाल्याने त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी तातडीने याकडे लक्ष देत त्यांच्या जिल्हा वार्षिक योजना निधीतून आठ लाख ५० हजार रुपये खर्च करून नवीन अंगणवाडी बांधण्यात आली आहे. यामध्ये वर्ग, किचन, स्टोअर रूम, शौचालय अशा सर्व सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. अंगणवाडीत चिमुकले विद्यार्थी शिकत असतात आणि त्यांच्यावर शैक्षणिक संस्कार घडविण्याची ती पहिली पायरी असते. आमदार प्रशांत ठाकूर आणि विद्यार्थी यांचे अतूट नाते आहे. त्या अनुषंगाने त्यांचे लक्ष विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी कायम असते. या अंगणवाडीच्या उभारणीमुळे ग्रामस्थांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानत त्यांना या वेळी धन्यवाद दिले.

अंगणवाडी उद्घाटन कार्यक्रमास माजी जि. प. सदस्य संजय पाटील, सरपंच सुरेखा पवार, उपसरपंच सुवर्णा पवार, (पान २ वर..)



# 'मन की बात' आज प्रथमच लाइव्ह

### सांगलीतील हमाल, भाजीविक्रेत्या साधणार पंतप्रधानांशी संवाद

**मिरज : प्रतिनिधी**

मन की बात हा कार्यक्रम रविवारी (दि. ३१) प्रथमच दृकश्राव्य पद्धतीने होत असून या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सांगलीतील हमाल व भाजी विक्रेत्या महिलांसोबत संवाद साधणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी गेली आठ वर्षे दर महिन्याच्या अखेरच्या रविवारी मन की बात या कार्यक्रमातून देशातील जनतेशी संवाद साधतात. प्रथमच महाराष्ट्रातील एका गावात हा कार्यक्रम लाइव्ह दाखवण्याचा निर्णय पंतप्रधान कार्यालयाने घेतला आहे.

माजी महापौर संगीता खोत यांच्या मिरजेतील किल्ला भागातील जनसंपर्क कार्यालयातून हमाल व भाजीविक्रेत्या महिला रविवारी सकाळी ११ वाजता 'मन की बात'मधून लाइव्ह सहभागी होणार आहेत. त्यांना पंतप्रधानांशी संवाद साधता येणार आहे. भाजप जिल्हाध्यक्ष दीपक शिंदे यांच्यासह भाजप नेत्यांनी हा कार्यक्रम पाहण्याचे आवाहन केले आहे. सांगलीतील 'मन की बात'चे संयोजक शुभम कुलकर्णी आहेत.




श्रावण सुरू झाला की, कविमन आपोआपच श्रावणधारांसारखं पाझरू लागतं. नवनवीन कल्पना त्यांच्या डोक्यातून बाहेर पडतात आणि मग दरवर्षी पावसावरील कवितांचा जणू पाऊसच पडतो. या वेळचं वातावरण अगदी तस्संच आहे. वरुणराजाही दमदार बरसला आहे. यासाठी आम्ही सर्व कवींना आग्रहानं निमंत्रित करीत आहोत. मग विचार कसला करता, उचला आपली लेखणी आणि लिहा पाऊस कविता. आम्ही त्यास यथायोग्य प्रसिद्धी देऊ...

श्रावण संपेपर्यंत मान्यवर कवींनी शब्दबद्ध केलेल्या कविता 'रामप्रहर'मध्ये दररोज एक या प्रमाणे (एका कवीची एकच कविता) प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कवींनी आपली अप्रकाशित कविता छायाचित्रासह 'रामप्रहर'कडे पाठवावी. त्या कवितेला 'श्रावणधारा' या सदराखाली योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल. -मुख्य संपादक

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रूपाली चौक, पनवेल ४१०२०६, रायगड.**
E.mail : ramprahar@gmail.com
**व्हॉट्सॲप क्रमांक ७७३८१०६००९**

# विमानतळ क्षेत्रातील इमारतींचा प्रश्न मार्गी

## ना हरकत प्रमाणपत्र देण्याची समस्या सोडविण्यात सिडकोला यश

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोच्या अथक प्रयत्नांनंतर आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे प्रभावित होणाऱ्या २० किलोमीटर क्षेत्रातील, नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाच्या ऑब्स्टॅकल लिमिटेशन सरफेस निकषातील मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करणाऱ्या ५५.१० मीटर एएमएसएल ते १६०.१० मीटर एएमएसएल (सरासरी समुद्र सपाटीपासून वर) नियोजित उंचीच्या इमारतींना ना हरकत प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे विमानतळ क्षेत्रातील इमारतींच्या विकासाला गती मिळणार असल्याचा दावा सिडकोने केला आहे.



नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभावित क्षेत्रातील इमारतींच्या उंचीवरील मर्यादेसंदर्भातील तांत्रिक अडचणींची समाधानकारक सोडवणूक करण्याकरिता नागरी हवाई वाहतूक मंत्रालय आणि भारतीय विमानतळ प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या क्षेत्रातील इमारतींच्या बांधकामांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या निर्णयामुळे विमानतळ प्रकल्पाच्या कामासही गती लाभणार आहे, तसेच विमानतळ प्रकल्प हा संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाकरिता योगदान देणारा ठरणार आहे.

भारत सरकारच्या नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने जारी केलेल्या नियमावलीनुसार, विमानतळाभोवतालच्या २० किलोमीटर क्षेत्रातील इमारतींना स्थानिक नगर नियोजन प्राधिकरणांकडून बांधकाम परवाना प्राप्त करण्यापूर्वी भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून इमारतीच्या उंची संदर्भातील वैध ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे. फेब्रुवारी २०२०पासून भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून नमुंआंवि भोवतालच्या २० किलोमीटर क्षेत्रातील

> **सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांतून आणि सहकार्याद्वारे एका तांत्रिक समस्येची सोडवणूक करता आली, ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या विकासाचे काम सुरळीतपणे पार पडण्यासह केवळ नमुंआंवि भोवतालच्याच नव्हे तर संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासास हा नागरिकस्नेही निर्णय पूरक ठरणार आहे.**
> **-डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

कोणत्याही बांधकाम प्रकल्पांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता केवळ ५५.१० मीटर एएमएसएल उंचीची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या हवाई क्षेत्रातील संभाव्य अडथळे टाळण्याकरिता उंचीची ही मर्यादा भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात आली होती.

यामुळे मागील दोन वर्षांपासून विमानतळ प्रभावित क्षेत्रातील नियोजित/पूर्ण झालेल्या/प्रगतीपथावर असलेल्या निवासी तसेच वाणिज्यिक बांधकाम प्रकल्पांना स्थानिक प्राधिकरणांकडून बांधकाम परवाना, भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्यात विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांना अडचणी येत होत्या. याकरिता प्रकल्पबाधित, विकासक, बांधकाम व्यावसायिक आणि सर्वसामान्य जनता, अशा विविध घटकांकडून इमारतींच्या उंचीबाबतची अट शिथिल करण्यासंदर्भात सिडकोला विनंती करण्यात आली होती.

२२ जुलै २०२२ रोजी भारत सरकारचे नागरी हवाई वाहतूक मंत्रालय, भारतीय विमानतळ प्राधिकरण, सिडको, एनएमआयएएल आणि आयई-एईसीकॉमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पार पडलेल्या बैठकीत संयुक्तरीत्या हा निर्णय घेण्यात आला. भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून साधारणत: ऑगस्ट २०२२च्या पहिल्या आठवड्यापासून ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ५५.१ मीटर एएमएसएलहून अधिक उंचीच्या इमारतींकरिता ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करू इच्छिणाऱ्या अर्जदारांनी याकरिता भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावेत.

या निर्णयामुळे विमानतळभोवतालच्या क्षेत्रातील बांधकाम तसेच विकास प्रकल्पांचा मार्ग मोकळा झाला असून या प्रकल्पांना गती मिळणार आहे, असे सिडकोच्या प्रसिद्धीपत्रकात नमुद करण्यात आले आहे.



# रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीचा सनद सादरीकरण व स्थापना समारंभ

## आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीमधील रोटरी कम्युनिटी हॉलमध्ये 'रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीचा सनद सादरीकरण आणि स्थापना समारंभ शुक्रवारी (दि. २९) साजरा झाला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि डिस्ट्रीक्ट गव्हर्नर डॉ. अनिल परमार उपस्थित होते. या कार्यक्रमात रोटेरीयन ध्वनी हरमेश तन्ना यांची सनदी अध्यक्षपदी आणि सीडीआर दीपक जांबेकर यांची सनदी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रथम महिला रोटेरीयन डॉक्टर हेमा परमार, जिल्हा सदस्यत्व संचालक रोटेरीयन पंकज पटेल, न्यू क्लबचे सल्लागार आणि सहायक गव्हर्नर रोटेरीयन मुनोज मुनोत, रोटरी क्लब ऑफ पनवेल एलिटच्या अध्यक्षा डॉ. स्वाती लिखिते, सीडीआर दीपक जोंकर, यांना रोटेरीयन आदित्य जोशी, सनदी कोषाध्यक्ष रोटेरीयन भावेश रंगपरिया, डॉ. रोहित जाधव यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.


या वेळी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. परमार यांनी रोटरी इंटरनॅशनलद्दल सांगितले की, इतिहासात प्रथमच आरआयच्या अध्यक्ष एक महिला आहेत आणि नवीन क्लबच्या सनदी अध्यक्ष ध्वनी यादेखील एक महिला आहेत, तसेच रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी हा रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ भारतातील पहिला क्लब आहे ज्याला २ जुलै २०२२ मध्ये सनद मिळाली असल्याचे सांगत नियुक्य पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# हवामान बदलामुळे संसर्गजन्य आजार वाढले

## उरणमध्ये खासगी, शासकीय रुग्णालयांत रुग्णांची गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

सध्या पावसाने दरी मारल्याने ढगाळ व उन्ह यांचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे सातत्याने हवेत होणारा बदल यामुळे उरण तालुक्यातील शहरी तसेच ग्रामीण भागातील रहिवाशांना सध्या सर्दी, खोकला, घसा दुखी, अंगदुखी, काविळ या सारख्या आजाराबरोबर ताप,



मलेरिया या आजारांनी ग्रासले आहे. त्यामुळे सदर आजारांवर उपचार करून घेण्यासाठी रुग्ण रुग्णालयांमध्ये ये-जा करत असल्याचे चित्र खासगी व शासकीय रुग्णालयात पहावयास मिळत आहे.

चिरनेर येथील डॉ. प्रकाश मेहता यांनी माहिती देताना सांगितले की, सध्या हवामानातील बदलामुळे आणि वाढत्या उष्णतेमुळे तसेच दुषित पाण्यामुळे रहिवाशांना सर्दी, खोकला, घसा दुखी, अंगदुखी, ताप यासारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे.तरी रहिवाशांनी घाबरून न जाता आपले परिसर स्वच्छ ठेवून घरातील पाणी उकळून घ्यावे, तेलकट पदार्थ खाणे टाळावे तसेच घाबरून न जाता आप आपल्या परिसरातील डॉक्टरांच्या सल्ल्याने या आजारांवर उपचार करून घ्यावेत, असे आवाहन आहे.

# दिघाटी येथे उद्या वह्यावाटप कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल माध्यमातून इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटपाचा कार्यक्रम सोमवारी (दि. १ ऑगस्ट) सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, माजी उपसरपंच दत्तात्रेय पाटील, सरपंच अमित पाटील, उपसरपंच रोहिदास शेंडगे, केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष हिरामण ठाकूर, ज्येष्ठ नेते चांगाजी पाटील, बळीराम ठाकूर व सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि शाळा कमिटी अध्यक्ष प्रवीण पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.



**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने लोकनेते दि. बा. पाटील शाळेत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, सरचिटणीस सपना पाटील, प्रा. राठोड आदी उपस्थित होते.**

# गोल्ड मेडलिस्ट सुभाष पुजारींचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

५४ वी एशियन बॉडीबिल्डिंग फिजिक्स इन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२२ मध्ये सहायक पोलिस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी गोल्ड मेडल मिळविल्याबद्दल गमप्रो ड्रीलिंग फ्लुइड कंपनीतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.



या वेळी कंपनीचे चेअरमन आनंद गुप्ता यांनी सांगितले की, सुभाष पुजारी यांनी गोल्ड मेडल मिळवून महाराष्ट्र तसेच देशाचे नाव उंचावले त्याबद्दल आम्हाला जनता सार्थ अभिमान आहे. तसेच आमच्या कंपनीकडून सर्व सहकार्य करणार असल्याचे आश्वासित केले.

या वेळी कंपनीचे डायरेक्टर विवेक गुप्ता, सीईओ राजीव रंजन, डायरेक्टर प्रदीप कोपीकर, डीजीएमएचआर नवीन डिसोझा तसेच कंपनीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पाले गावातील शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

## आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**उरण : बातमीदार**

आमदार महेश बालदी यांच्या वाढदिवस १७ जुलै रोजी झाला. तरीही उरण मतदारसंघात विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यानुसार श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या पाले येथील शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.



या वेळी शाळा व्यवस्थापन कमिटी व भारतीय जनता पक्षाचे गाव अध्यक्ष तथा ग्रामविकास कमिटीचे अध्यक्ष अमित म्हात्रे, भाजपा चिरनेर जिल्हा परिषद युवा चिटणीस पंकेश म्हात्रे, उपाध्यक्ष गोरक्षनाथ म्हात्रे, युवा अध्यक्ष रमाकांत, मच्छिंद्र म्हात्रे, म्हात्रे, युवा उपाध्यक्ष प्रदीप म्हात्रे, सुरेश म्हात्रे, हरिश्चंद्र म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, कमलाकर म्हात्रे,शरद म्हात्रे, शाळा व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष मेनन म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, शाळेचे मुख्याध्यापक उपेंद्र ठाकूर आदी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी आमदार महेश बालदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



**कामोठे : भीमा तुम्हा वंदना या मराठी वाद्यवृंदाच्या (मुंबई) वतीने प्राथमिक शाळा जुई येथे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी भास्कर भेंडे, मधुकर सुरते, हनुमान जोशी, पोकळे, नागरगोजे, माने मॅडम, विनय गिलबिले, रमेश काळे आदी उपस्थित होते.**

## निवडक

### अनोळखी व्यक्तीची गळा आवळून हत्या

**पनवेल :** तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनोळखी व्यक्तीची गळा आवळून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. तालुका हद्दीतील मालडुंगे गाव ते बदलापूर वांगणीकडे जाणाऱ्या पायवाटेच्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या मोहाच्या माळीच्या झाडीत अंदाजे ३० ते ३५ वर्षीय अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आलेला आहे. या मृतदेहास गळ्याभोवती पांढऱ्या रंगाचा गमचा गुंडाळून त्याचा गळा आवळून जीवे ठार मारण्यात आले व त्यानंतर त्याची ओळख पटू नये याकरिता त्यास जाळून टाकण्याचा प्रयत्न करून त्याचा चेहरा विद्रुप केला आहे. या इसमाच्या अंगात चॉकलेटी जळालेला फुल शर्ट व आतमध्ये लाल सँडो बनियान व हाफ गडद निळी हाफ पॅन्ट व त्यावर इंग्रजीत adibas अशी प्रिंट आहे. हा मृतदेह शव विच्छेदनाकरता पनवेल उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आला आहे. तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अल्पवयीन तरुणाची आत्महत्या

**पनवेल :** नॅचरल होम, नेरे येथे राहणाऱ्या १६ वर्षीय सुमित



मंडल याने राहत्या घरात पंख्याला ओढणीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती पनवेल तालुका पोलिसांना देण्यात आली. आत्महत्येचे कारण समजू शकले नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. सुमितने दहावीची परीक्षा दिली होती. परीक्षेत तो उत्तीर्ण झाला होता. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात 'बिनधास्त बोल'

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि. ३०) व्यवस्थापन शिक्षण विभागाने बिनधास्त बोल या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.




कार्यक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षाच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे महाविद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्दीष्ट विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व क्षमता व त्यासाठी मनात असलेली भीती दूर करणे हे होते. कार्यक्रमाचे आयोजन व्यवस्थापन शिक्षण विभागप्रमुख प्रा.रित ठुले यांनी केले, तसेच अंकिता जांगिड, मीरा पटेल यांनी सहकार्य केले.

महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनीनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व दिलेल्या विषयावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी प्राध्यापकांचे कौतुक केले.



# उरणमध्ये रक्तदान शिबिराला नागरिकांचा लाभला प्रतिसाद

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील कै. अश्विन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उरण येथील नगरपालिकेचे बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल येथे शनिवारी (दि. ३०) कै. अश्विन पाटील यांचे कुटुंबीय व मित्रमंडळ यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे दुसरे वर्ष असून या शिबिरात १४० रक्तदात्यांचा प्रतिसाद लाभला.

## आयोजकांकडून रक्तदात्यांचा सन्मान

या वेळी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, तुषार पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष मिलिंद पाटील, रवी पाटील, गणेश पाटील, रमेश पाटील, अंकिता पाटील, दयाराम पाटील, प्रवीण पाटील, महादेव पाटील, योगेश गोवारी, दर्शन पाटील, चेतन पाटील, मनोज पाटील, दीप्ती पाटील, सुजय पाटील, निशा पाटील, जस्मिन पाटील, मनीष पाटील, चेतन पाटील, तुषार पाटील, महेंद्र खाडे, वृषाली पाटील, संजय चव्हाण आदी उपस्थित होते. दरम्यान, रक्तदात्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

# पनवेल महापालिकेतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निरोप

**पनवेल : प्रतिनिधी**

कामगार कल्याण, सुरक्षा, माहिती अधिकार विभाग प्रमुख कनिष्ठ लिपीक तथा प्र. अधिक्षक रमेश पाटील, शिपाई संजय परदेशी, बहुउद्देशिय कर्मचारी विजया जाधव यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम शुक्रवारी (दि. २९) आयुक्त कार्यालयाजवळील बैठक हॉलमध्ये झाला.

उपायुक्त विठ्ठल डाके, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, विभागप्रमुख यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी पालिकेतील, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे



नातेवाईक उपस्थित होते.

पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद काळात १९८६ साली रमेश पाटील यांनी रोजंदारीवर कामास सुरूवात केली. महापालिका स्थापन झाल्यानंतर नावाडा येथे अधिक्षकाचे कामकाज, जकात विभाग, सामान्य प्रशासन, बांधकाम विभाग, लेखा विभाग, आस्थापना विभाग, जन्म-मृत्यू विभाग, पाणी कर संकलन विभागामध्ये त्यांनी काम केले. त्यांनी नगर परिषद व महापालिकेतील अशी एकूण ३६ वर्षाची सेवा पूर्ण केली.

याचबरोबर मुख्यालयात पाणी कर संकलन विभागात शिपाई पदावर काम करणारे संजय परदेशी, पुर्वाश्रमिक घोट ग्रामपंचायतमध्ये काम केलेले, सध्या महापालिकेत काम करत असलेल्या बहुउद्देशिय कर्मचारी विजया जाधव यांचाही या वेळी सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला.

**अनिवासी भारतीय आणि जगभर फिरणारे भारतीय पर्यटक, यांचे अनेक देशांच्या दृष्टीने महत्त्व वाढत चालले आहे. याचे कारण काही भारतीयांनी गेले काही वर्षे मिळविलेली आर्थिक समृद्धी. भारताला त्याचा फायदा होत आहे, तो रिमिटन्सच्या मार्गाने. त्यामुळेच जगातील सर्वाधिक रिमिटन्स मिळविणारा असा देश म्हणजे भारत आहे. या रिमिटन्सच्या व्यवहाराला अनेक पैलू आहेत, जे समजून घेतले पाहिजे.**

# अनिवासी भारतीय आणि पर्यटकांचा डंका का वाजतोय?

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)




गेल्या शतकाच्या अखेरीस जग वाढत्या लोकसंख्येची काळजी करत होते, पण आता लोकसंख्या त्या वेगाने वाढणार नाही, असे स्पष्ट होऊ लागले आहे. अर्थात, भारताची लोकसंख्या इतर देशांपेक्षा अजूनही वेगाने वाढते आहे. पण लोकसंख्या वाढल्याने भारतावर कोणकोणती संकटे येवू शकतात, यासंबंधीच्या ज्या कल्पना केल्या जात होत्या, ०मात्र सध्या बदलून गेल्या आहेत. उलट वाढत्या लोकसंख्येमुळे देशाची अर्थव्यवस्था कशी अनेक संकटांपासून दूर रहाते, असे अर्थतज्ञ सांगू लागले आहेत. त्यांच्या म्हणण्यात काही प्रमाणात तथ्य निश्चित आहे. नव्हे, त्याची काही लक्षणे दिसू लागली आहेत. उदा. जेथे लोकसंख्या वेगाने कमी होते अशा युरोपमधील अनेक देश निर्वासितांचे स्वागत करताना दिसत आहेत. अमेरिकेसारख्या प्रगत देशात मंदी येणार की काय, अशी भीती व्यक्त केली जाते आहे. दुसरीकडे भारतातील अर्थव्यवस्था मंदीच्या संकटापासून दूर आहे. लोकसंख्येच्या ग्राहकशक्तीचा तो परिणाम आहे.

## अधिक खर्च करणारे भारतीय!

काही मोजके का होईना पण भारतीय अनुभवत असलेल्या आर्थिक समृद्धीचे सध्या जग लाभधारक आहे. असे म्हणण्याचे कारण म्हणजे भारताने कोरोनातून लवकर करून घेतलेली सुटका आणि काही भारतीयांच्या हातात खेळणारा पैसा. विमानभाडे वाढल्यामुळे तसेच मंकीपॉक्सच्या धोक्यामुळे अनेक देशातील नागरिक विमान प्रवास करणे टाळत आहेत. पण भारतात झालेल्या लसीकरणामुळे भारतीय मात्र काम आणि पर्यटनासाठी जगभर प्रवास करत आहेत. त्याचा आणखी एक फायदा होतो आहे, तो म्हणजे भारतीयांना व्हिसा मिळण्यात येणाऱ्या अडचणी कमी केल्या पाहिजेत, असे अनेक देशांना वाटू लागले आहे. उदा. मलेशियाने अलीकडेच भारतीयांना विमानतळावर उतरल्यावर व्हिसा देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. युरोपीय देश व्हिसा देण्यात उशीर करत असल्याने अनेक भारतीयांनी आपला मोर्चा सिंगापूर, मलेशिया तसेच आखाती देशांकडे वळविला आहे. सिंगापूरला या वर्षातील पहिल्या सहा महिन्यात १५ लाख विदेशी नागरिकांनी भेट दिली, त्यात भारतीयांचा वाटा तब्बल दोन लाख १९ हजार एवढा अधिक आहे. भारतातील आठ शहरातून सिंगापूरला जाण्याची सोय उपलब्ध आहे आणि आठवड्यात विमानांच्या १८० फेऱ्या होत आहेत. आखातात भारतीय पुन्हा जायला सुरवात झाल्याने तिकडे जाणारी विमाने भरून जात आहेत. ब्रिटनच्या हिथ्रो विमानतळाने क्षमतेपेक्षा(दरदिवशी एक लाख) अधिक प्रवासी येण्यास परवानगी नाकारल्याने तसेच जर्मनीतील विमान कंपनीतील कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा संप पुकारल्याने युरोपचा विमान प्रवास सुखकर राहिलेला नाही. मात्र भारतीयांचे युरोपमध्येही महत्त्व वाढल्यामुळे युरोपला त्यात सुधारणा करावी लागेल. विशेषतः व्हिसा देण्यात युरोपीय देशांकडून जी दिरंगाई होते आहे, त्याचा युरोपला फटका बसू शकतो. भारतीय पर्यटक पूर्वी अधिक खर्च न करण्यासाठी प्रसिद्ध होते आणि आता ते अधिक खर्च करणारे पर्यटक आहेत, हा मोठा बदल आहे.



## रिमिटन्स तब्बल ८७ अब्ज डॉलर

अर्थव्यवस्थेमध्ये जशी ग्राहकशक्ती महत्वाची आहे, तेवढाच रोजगार महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येला काम देणे, हे मोठे आव्हान असल्याने आणि भारतात तेवढ्या वेगाने रोजगार वाढत नसल्याने बाहेरदेशी रोजगारासाठी नागरिक जाताना दिसतात. त्यांनी आपली सेवा आणि बुद्धी इतर देशांसाठी खर्च करावी की नाही, हा मुद्दा आता मागे पडला आहे. उलट आता असे नागरीक देशात पाठवीत असलेल्या डॉलरचा भारताच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागतो आहे. ही रक्कम किरकोळ असती तर त्याकडे दुर्लक्ष करता आले असते, पण ही रक्कम आणि तिचे भारतावर होणारे परिणाम आता चांगलेच दखलपात्र झाले आहेत. विदेशात गेलेले नागरिक आपल्या देशात नियमित पैसा पाठवितात, त्याला रिमिटन्स म्हणतात. असा जगातील सर्वाधिक रिमटन्स (२०२१) आज भारताला(मध्यम उत्पन्न गटातील देशात)मिळतो आहे. तो आहे तब्बल ८७ अब्ज डॉलर!

## रिमिटन्सचे विविध पैलू

जगातील सर्वात अधिक रिमिटन्सचे विविध पैलू आहेत. त्यातील काही प्रमुख असे–१. आतापर्यंत आखाती देशात सर्वाधिक भारतीय होते, पण कोरोना काळात त्यातील अनेकांच्या नोकऱ्या गेल्यामुळे तेथून येणारा रिमिटन्स कमी झाला आहे. २०१६–१७ च्या तुलनेत तो ५० टक्क्यांनी कमी झाला, यावरून त्या काळात किती नोकऱ्या गेल्या, हे लक्षात येते. २. याच काळात अमेरिकेची अर्थव्यवस्था तुलनेने स्थिर असल्याने तेथील भारतीयांनी पाठविलेला रिमिटन्स आखातातील भारतीयांनी पाठविलेल्या रिमिटन्स प्रथमच वाढला आहे. (एकूण रिमिटन्सच्या २३ टक्के) ३. २०२१मध्ये जगातील१२ टक्के रिमिटन्स भारताच्या वाट्याला आला आहे. पूर्वी चीनला मिळणारा रिमटन्स सर्वाधिक होता. ४. कोरोना काळात भारतीय कुटुंबांना रिमिटन्सचा मोठा आधार झाला आहे. ५. या काळात आलेला रिमिटन्स हा भारताच्या परकीय गुंतवणुकीपेक्षाही अधिक ठरला. ६. ब्रिटन आणि सिंगापूर येथेही अनिवासी भारतीयांची संख्या मोठी असल्याने आणि तेथील मनुष्यबळ हे व्हाईट कॉलर नोकऱ्यांत असल्याने या दोन्ही देशातून येणाऱ्या रिमिटन्सचे प्रमाण वाढले आहे. ७. रिमिटन्सचा लाभ होणारे भारताशिवायचे प्रमुख देश चीन, मेक्सिको, (५३ अब्ज डॉलर) फिलीपाईन्स (३६ अब्ज डॉलर) आणि इजिप्त (३३ अब्ज डॉलर) हे देश आहेत. ८. इतर देशात नोकरी व्यवसायासाठी जाणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने वाढत चालले असून सध्या जगातील आठ पैकी एक नागरिक विदेशात राहतो आहे. ९. देशाच्या आर्थिक स्थैर्यामध्ये परकीय चलनाच्या साठ्याला अतिशय महत्त्व आहे. तो साठा समाधानकारक (६०० अब्ज डॉलर) राहिल्यानेच आज भारत इंधन दरवाढ आणि डॉलरच्या तुलनेत इतर चलनांच्या मूल्यात होणाऱ्या संकटापासून सुरक्षित राहू शकला. त्यामुळेच भारताच्या रुपयाची घसरण मर्यादित राहिली. १०. विकसित देशातील मनुष्यबळाची गरज पुढेही वाढत जाणार असून उच्च शिक्षण तसेच इंग्रजी भाषेच्या शिक्षणामुळे भारतीयांना ती गरज भरून काढण्याची चांगली संधी आहे. म्हणजे पुढील काळातही भारतीय तरुण बाहेर जात रहाणार आणि त्यांचा रिमिटन्स भारतात येत राहणार आहे.





## गोल्डन व्हिसा आणि भारतीय

अनिवासी भारतीय जी आर्थिक समृद्धी आज अनुभवत आहेत, ती त्यांना आणि देशवासियांना भारतातच मिळायला हवी, हे खरे आहे. पण लगेचच ते शक्य नाही. त्यामुळेभारतीय ती इतर देशात जाऊन मिळवत असतील तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. अशी ही आर्थिक समृद्धी मिळविण्यात भारतीय कसे आघाडीवर आहेत, पहा. चांगले मनुष्यबळ युनायटेड अरब अमिरातीत (दुबई, बहारीन) येवून रहावे, यासाठी तेथील नियम अलीकडे शिथील करण्यात आले. गोल्डन व्हीसा मिळाल्यास तेथे दीर्घकाळ(आता पाचऐवजी १० वर्षे) रहाता येते. अर्थात, त्यासाठी तेथे विशिष्ट रकमेची मालमत्ता विकत घ्यावी लागते. अशी मालमत्ता म्हणजे सेकंड होम घेणाऱ्यांमध्येही भारतीय आघाडीवर आहेत. केवळ मालमत्ताच नव्हे तर तेथील स्टार्टअपमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांमध्येही भारतीयांचा भरणा अधिक आहे. दुबईत कॅपिटल गेन कर लागत नसल्यामुळेही भारतीय ही गुंतवणूक करत आहेत. मालमत्ता विकल्यावर तो पैसा डॉलरमध्ये मिळतो. असे हे डॉलर कोणत्या ना कोणत्या मार्गाने अखेर भारतात येण्याची शक्यता आहे.

# बाजाराचा मूड सांगणारी अशी आहेत आवर्तने!

**तांत्रिक विश्लेषण हे कोणत्याही प्रकारच्या बाजारात म्हणजे शेअरबाजार, कमॉडिटी मार्केट, करन्सी मार्केट, क्रिप्टो करन्सी उपयोगात आणता येते. त्याआधी एकूणच बाजारामधील भावना, मानसिकता समजून घेतली पाहिजे. आपण कोणत्या बाजाराचा संदर्भ देत आहोत हे महत्त्वाचे नाही, सर्व एकाच अवस्थांमधून व आवर्तनांमधून जातात. ते वर येतात, शिखर गाठतात, कोसळतात आणि नंतर तळ गाठतात. असे हे बाजाराचे एक आवर्तन पूर्ण झाले की, दुसरे सुरू होते.**


प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com




## संचयन (ॲक्युम्युलेशन)

हा टप्पा तेव्हा येतो जेव्हा बाजार तळाशी असतो. गुंतवणूकदारांनी घेतलेल्या तेजीच्या पोझिशन्स आणि घेतलेले शेअर्स नुकतेच कंटाळून मंदीच्या बाजारात विकून टाकलेल्या असतात आणि उर्वरित होल्डिंग्सची देखील घबराटीमुळे विक्री केलेली असते. तर, नवोन्मेषक (कॉर्पोरेट इनसाइडर्स आणि काही व्हॅल्यू इन्व्हेस्टर्स) आणि स्मार्ट मनी मॅनेजर आणि अनुभवी ट्रेडर्स या परिस्थितीच्या बाजारात मूल्य शोधण्यास सुरुवात करतात आणि वाईटात वाईट संपले आहे हे लक्षात घेऊन खरेदी करण्यास सुरवात करतात. या टप्प्यावर, मूल्यांकने खूप आकर्षक असतात. परंतु सामान्य बाजार भावना (सार्वजनिक मानसशास्त्र) अजूनही मंदीचाच विचार करत असते. अशा कवडीमोल भावात निराशेमध्ये विकले जाणारे उत्तम कंपन्यांचे शेअर्स घेण्यासाठी तेजीची धारणा असलेले मोठे गुंतवणूकदार तयारच असतात आणि त्यासाठी त्यांना मोठी गुंतवणूक करण्यासाठी प्रचंड निधीची आवश्यकता असते, जेणेकरून विक्रीसाठी आलेल्या संपूर्ण शेअर्सची खरेदी करत विक्रीचा दबाव शोषून घेण्यासाठी. (म्हणून त्यांना मोठे खेळाडू म्हणतात).

## वाढीचा टप्पा

मागील टप्प्यातील परिस्थितीमुळे या टप्प्यात बाजारातील घसरण थांबलेली असते आणि बाजार हळूहळू स्थिरावत असतो. नंतर, बाजार संचयन अवस्थेतून बाहेर पडतो आणि शेवटच्या टप्प्यात धास्तावून जाऊन केलेल्या विक्रीस बाजारात तेजी करणारे पुरून उरल्यामुळे शोषून घेतल्याने बाजाराचा वरील बाजूस नवीन प्रवास सुरू होतो. हळूहळू, बाजारात लोकांचा सहभाग वाढत जातो आणि त्याजबरोबर आशावादही. वाढत्या सहभागामुळे बाजारामधील वाटचालीचा कल तेजीचा होऊ लागतो. हा टप्पा जसजसा परिपक्व होतो, तसतसे अधिक गुंतवणूकदार या वाढत्या तेजीमध्ये उडया घेतात कारण लोभ निर्माण होत असतो आणि ही लोभधारणा भीतीवर मात करते. या अवस्थेच्या शेवटी, तेजी गमावण्याच्या भीतीपोटी (FOMO घटक) उरलेसुरले लोक बाजारातील मूल्यमापनाचा विचार न करता आर्थिक नियोजनबद्धता डावलून या अवस्थेत स्वतःला झोकून देतात. या टप्प्यावर, ग्रेटर फूल थिअरी (अधिक मूर्ख सिद्धांत) प्रचलित ठरत जातो. हा टप्पा बुल–रन म्हणून ओळखला जातो.

## वितरण अवस्था

या टप्प्यात, बाजारातील सहभागी, विशेषतः सामान्य किरकोळ गुंतवणूकदार हे अतिउत्साहीत होतात आणि बाजाराकडून अवास्तव अपेक्षा (लोभ) ठेवतात, जरी मूल्ये उच्च पातळीवर असली तरीही. कारण सगळीकडंच तेजीला उधाण आलेले असते जरी हा तेजीचा (अवास्तव) बुडबुडा फुटू शकतो ही धाकधूक असून देखील त्याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते कारण असा विचार करणारा मूर्ख वाटत असतो. कारण याच वेळेस प्रसार माध्यमदेखील तेजीस पूरक अशाच गोष्टी मांडत असतात. असा बाधक उत्साह पाहून मोठे खेळाडू हळूहळू त्यांचं वाटप (विक्री) सुरू करतात. ही अवस्था संचयन अवस्थेसारखीच आहे फक्त उलट पद्धतीने. या अवस्थेतील सर्व फाजील खरेदीची बेगमी ही मोठ्या खेळाडूंद्वारे केली जाते. त्यामुळे बाजारातील सुसाट तेजीला लगाम बसतो. हा टप्पा संभाव्य मंदीची पूर्व चेतावणी देऊ शकतो.

## पडझड किंवा मंदी

या आवर्तनामधील चौथा व शेवटचा टप्पा म्हणजे मोठ्या प्रमाणावर विक्रीचा दबाव. या परिस्थितीत कोणतीही वाईट बातमी ही तत्कालिक विक्रीचे कारण असू शकते. बाजारातील ही पडझड म्हणजे भाव सुधारणा (प्राईस करेक्शन) समजून फाजील तेजीच्या बुडबुड्याच्या काळातील गुंतवणूकदार या अवस्थेत आपल्या गुंतवणुकीत आणखी भर घालतात, जेणेकरून त्यांच्या खरेदी भावाची सरासरी खालती येईल. तर अनेकजण त्यांच्या गुंतवणुकीवर हट्टीपणे अडून राहतात कारण त्यांची गुंतवणूक ही नुकसानीत बदलेली असते. या प्रकारात असे गुंतवणूकदार स्वतःलाच समजवत राहतात की दीर्घावधीसाठी केलेली गुंतवणूक नुकसानीत विकण्यात अर्थ नाही आणि दुदैवाने असेच गुंतवणूकदार बाजार तळाशी जाताच संयम गमावतात आणि आपली सांभाळलेली गुंतवणूक विकून टाकतात. या अवस्थेस मंदी किंवा बेअर मार्केट म्हटले जाते.

या झाल्या बाजारातील सर्वसामान्य अवस्था. प्रत्येकाने प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे या अवस्था अनुभवल्या असतीलच. पुढील लेखांत आपण बाजारातील विविध सिद्धांत पाहूयात...

### अर्थसाक्षर स्पर्धा : २९

**निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रश्न क्र. १. निफ्टी प्राईव्हेट बँक निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या बँकेचा समावेश होत नाही?**
***ई.*** युको बँक

**प्रश्न क्र. २. निफ्टी आयटी निर्देशांकात पुढीलपैकी कोणत्या कंपनीचा समावेश होत नाही?**
***इ.*** आयटीसी

**प्रश्न क्र. ३. पुढीलपैकी कोणत्या कंपनीचे बाजारमूल्य सात लाख कोटींच्या वर नाही? (जुलै २०२२)**
***आ.*** एलआयसी

**अर्थसाक्षर स्पर्धा २९च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा २८साठी एकही विजेता नाही.**

### राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३०

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. पुढीलपैकी कोणती उर्जा कंपनी सरकारी मालकीची नाही?**
***अ.*** एनटीपीसी ***आ.*** पॉवर ग्रीड ***इ.*** गेल ***ई.*** टाटा पॉवर

**२. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**
***अ.*** गृह कर्ज ***आ.*** कारवरील कर्ज
***इ.*** क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज ***ई.*** इन्शुरन्स पॉलिसीवर घेतलेले कर्ज

**३. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**
***अ.*** नटराजन चंद्रशेखरन ***आ.*** राकेश झुनझुनवाला ***इ.*** रमेश दमाणी ***ई.*** नंदन निलकेणी




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# माणगावमध्ये नौकानयन व्यवसायाचा शुभारंभ

## स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी आमदार गोगावलेंच्या हस्ते कुंडलिका नदीवर फोडला नारळ





**माणगाव : प्रतिनिधी**

स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी आमदार भरत गोगावले यांनी शनिवारी (दि. ३०) माणगाव तालुक्यातील रवाळजे येथील कुंडलिका नदीवर नारळ फोडून रिव्हर राफ्टींग (नौकानयन) व्यवसायाचा शुभारंभ केला.

उत्तराखंड आणि हिमाचलमध्ये प्रसिद्ध असलेला रिव्हर राफ्टींग हा साहसी खेळ रायगडमधील तरुणांनी कुंडलीका नदीमध्ये सुमारे २०वर्षांपूर्वी सुरु केला होता. आज कुंडलीका नदी आणि कोलाड हे रिव्हर राफ्टींगसाठी प्रसिद्ध आहे. या रिव्हर राफ्टींगमुळे माणगाव तालुक्यातील साजे, रवाळजे, पाटणूस, विळे, लवलेवाडी, वांगणेवाडी, कुडली, सुतारवाडी, येरद आणि कामत या गावातील ग्रामस्थांना घरच्या घरी व्यवसाय निर्माण झाल्याने रोजगार मिळाला. मात्र लघुपाटबंधारे विभागाने कोलाड येथील एका कंपनीला राफ्टींगचा ठेका दिल्यानंतर अनेक दिवसापासून स्थानिकांत नाराजी पसरली होती.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा जिल्हाधिकारी, पाटबंधारे विभाग कार्यकारी अभियंता, तहसीलदार, प्रांत अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाबरोबर पत्रव्यवहार करून स्थानिकांना या नदीत व्यवसाय करण्यासाठी ठेका द्यावा, अशी मागणी केली होती. मात्र त्याकडे संबधित अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे स्थानिकांनी आमदार भरत गोगावले यांना प्रत्यक्ष भेटून मुद्दा मांडला. त्यानंतर आमदार गोगावले यांनी शनिवारी कुंडलिका नदीवर स्थानिकांनाही रोजगार मिळावा यासाठी नारळ फोडून नौकानयनचा शुभारंभ केला.

कुंडलिका नदीमध्ये रिव्हर राफ्टींग (नौकानयन) हा व्यवसाय गेले अनेक दिवसापासून एका कंपनी मार्फत चालविला जात होता. तेव्हा त्या कंपनीने तेथील स्थानिकांना रोजगार मिळावा म्हणून स्थानिक सुशिक्षित तरुणांना बरोबर घेऊन १० ते १५ स्थानिक लोकांना व्यवसाय करण्यासाठी परवानगी दिली होती. त्यानंतर २०१९-२० व २०२०-२१ या दोन्ही वर्षी कोलाड कार्यकारी अभियंता यांनी मर्जीतल्या ठेकेदारास ठेका दिला असा आरोप स्थानिकांनी आमदार भरत गोगावले यांना दिलेल्या निवेदन केला आहे. त्यांनतरही २०२२-२३ सुधारित ठेका परत त्याच ठेकेदाराला देण्याचा घाट घातला असल्याचा आरोप रवाळजे सरपंच नम्रता लाड, तसेच हरेश लाड, विष्णू भोसले आदी ग्रामस्थांनी केला आहे.

**या रिव्हर राफ्टींग प्रकरणी स्थानिक ग्रामस्थ आणि व्यवसाईकांनी आपली कैफियत आपल्याकडे मांडली असून, स्थानिकांना व्यवसाय मिळवून देण्याचा शब्द आपण दिला आहे.**
**-भरत गोगावले, आमदार**

**कुंडलिका नदीतील राफ्टींगबाबत स्थानिकांचे म्हणणे वरिष्ठांपुढे मांडले असून वरिष्ठ पातळीवर त्याबाबत निर्णय घेतला जाईल.**
**-ए. व्ही. चिमलगी, उपविभागिय अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, कोलाड**

# भार्जेवाडीत विद्युत खांब कोसळला



(छाया : धम्मशील सावंत)

## ग्रामस्थ थोडक्यात बचावला, दोन गावे बुडाली अंधारात

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील भार्जेवाडी गावातील अनेक महिन्यापासून गंजलेल्या अवस्थेत असलेला लोखंडी विजेचा खांब कोसळला. त्यावेळी ग्रामस्थ चोरघे तेथून जात होते. सुदैवाने ते थोडक्यात बचावले. मात्र या घटनेमुळे भार्जेवाडी व आंबोलेवाडी ही दोन गावे अंधारात असून महावितरणने तात्काळ नवीन खांब उभारून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

भार्जेवाडी गावातील लोखंडी विद्युत खांब गंजल्याची माहिती व त्या संबधित अर्ज ग्रामस्थांनी वारंवार देऊनही महावितरणने त्याकडे दुर्लक्ष केले. शेवटी वीज प्रवाह सुरू असतानाच हा गंजलेला खांब कोसळून व तारा तुटून गावातील रस्त्यावर पडल्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवतीहानी झाली नाही.

**भार्जेवाडी गावातील लोखंडी खांब गंजून जीर्ण झाल्याची निवेदने महावितरणला वारंवार दिली होती. तो खांब कोसळल्यामुळे भार्जेवाडी व आंबोलेवाडी ही गावे अंधारात आहेत. नवीन खांब बसवून वीजपुरवठा पूर्ववत सुरळीत करावा**
**- प्रकाश मांडवकर, माजी अध्यक्ष, नवगाव मराठा समाज**

# पोलादपुरातील जुगार अड्ड्यावर धाड

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे यांनी शुक्रवारी (दि. २९) सायंकाळी पोलादपूर शहरातील एका जुगार अड्ड्यावर धाड टाकून मुद्देमालासह दोन जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

**मुद्देमालासह दोन जण ताब्यात**

ल्याची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्यामधून देण्यात आली. दरम्यान, धाडीमध्ये सापडलेल्या दोन पावती पुस्तकांपैकी एका डायरीवर इंग्रजीमधील 'के' अक्षर दिसून आल्याने हा कल्याण मटका असल्याची खात्री पटल्याने आरोपींविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियम १८८७ कलम १२ अ प्रमाणे कारवाई करून ताब्यात घेतले आहे.

पोलादपूर शहरातील शिवाजीनगर मटनमार्केट परिसरामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे यांनी शुक्रवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास धाड टाकून २१हजार ५००रूपयांची रोख रक्कम, पाच हजार रुपयांचा व्हिवो कंपनीचा जिओ सीमसोबत हॅण्डसेट तसेच पाच हजार रुपयांचा ओपो कंपनीचा जिओ सीमसोबत हॅण्डसेट, पावतीपुस्तक, कार्बन पेपर आणि पेन असा एकूण ३१ हजार ५०५ रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. तसेच सोमनाथ जाधव आणि हुकूमचंद शेडगे यांच्यावर पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

# पोलादपुरातील शेकाप कार्यकर्त्यांचा शिंदे गटात प्रवेश

## आमदार भरत गोगावले यांनी केले स्वागत

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील माटवण येथील शेकापच्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आमदार भरत गोगावले यांच्या शिवनेरी या निवासस्थानी शिंदे गटात प्रवेश केला. त्याचे आमदार गोगावले यांनी भगव्या पताका घालून स्वागत केले.



(छाया : शैलेश पालकर)

माटवण बौध्दवाडीतील संतोष गायकवाड, प्रशांत गायकवाड, राहुल गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, संतोष ह. गायकवाड, रुपेश गायकवाड, सुनील गायकवाड, सुमित गायकवाड, नितेश गायकवाड, साहिल गायकवाड, निखिल गायकवाड, प्रमोद गायकवाड, शुभम गायकवाड, शुभम राहुल गायकवाड, अशोक गायकवाड, सयाजी गायकवाड, अनंत गायकवाड, राजेश गायकवाड, जगन्नाथ गायकवाड, धर्म गायकवाड, प्रकाश गायकवाड, अक्षय गायकवाड, प्रदीप गायकवाड, निखिल गायकवाड, समीर गायकवाड, हरिचंद्र गायकवाड, विवेक शिंदे, सुजय गायकवाड, सचिन गायकवाड, स्वप्नेश गायकवाड, इत्यादी शेकाप कार्यकर्त्यांनी आमदार भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. या वेळी जिल्हा परिषद माजी सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे, विभाग प्रमुख सयाजी मांढरे, माटवण सरपंच शंकर सागवेकर, उपसरपंच संतोष दिघे, गणेश गोगावले, शाखा प्रमुख दिलीप गोगावले, माजी उपसरपंच अरुण नगरकर, गणपत मोरे, माजी उपसरपंच अफताब नाडकर, किशोर नांदिवडेकर, नितीन कालगुडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# अलिबाग येथे उज्ज्वल भारत उज्ज्वल भविष्य कार्यक्रम

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अभियंता, तंत्रज्ञांचा गौरव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत अलिबाग येथील जिल्हा नियोजन सभागृहात शुक्रवारी (दि. २९) उज्ज्वल भारत उज्ज्वल भविष्य पॉवर २०४७ कार्यक्रम साजरा करण्यात आला. वीज विभागातर्फे मागील आठ वर्षामध्ये केलेल्या कामाची माहिती पथनाट्य व चित्रफीतीद्वारे सादर करण्यात आली.



महावितरणचे अधीक्षक अभियंता (पेण) इब्राहिम मुलाणी यांनी प्रास्ताविकात घारापुरी बेट, तुंगी दुर्गमवाडी व रायगड किल्ला येथे केलेल्या विद्युतीकरणाची माहिती दिली. महावितरणच्या कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक चंद्रकांत डांगे यांनी, वीज विभागाचा इतिहास सांगून, महावितरण तर्फे राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी विविध नैसर्गिक आपत्तीमध्ये जिल्ह्यात अखंडीत वीजपुरवठा केल्याबद्दल सर्व वीज कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा पत्रकार संघा तर्फे प्रातिनिधिक स्वरुपात महावितरणचे अभियंते तथा तंत्रज्ञ यांचा प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला.

या वेळी महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी पोवाडा व कोळीगीत सादर केले. दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना, कुसुम योजना, सौभाग्य योजनेतील लाभार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते, त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे.

पावर ग्रिड कार्पोरेशनचे उपमहाप्रबंधक वैभव भंडारकर, महानिर्मिती कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील वाघ, महापारेषण कंपनीचे कार्यकारी अभियंता मनोज जोशी, ज्येष्ठ पत्रकार जयंत धुळप, यांच्यासह वीज कर्मचारी व अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी माउंट नन पर्वतारोहण मोहिमेला दाखविला हिरवा झेंडा

**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सेंट्रल रेल्वे ॲडव्हेंचर स्पोर्ट्स क्लबने (सीआरएएससी) हिमालयातील नन पर्वतावर चढाई करण्याची ही मोहीम आखली आहे. मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक अनिल कुमार लाहोटी यांनी शुक्रवारी (दि. २९) या मोहीमेला हिरवा झेंडा दाखवला. या वेळी मुख्य प्रशासकीय अधिकारी (निर्माण) मनोज शर्मा उपस्थित होते.

लडाखच्या सूर खोऱ्यात वसलेले माउंट नन हे अतिशय कठीण आणि थंड शिखर म्हणून ओळखले जाते. या शिखराची उंची समुद्रसपाटीपासून २३,४०९ फूट (७१३५मीटर)आहे. रेल्वेच्या मुंबई विभाग अभियांत्रिकी शाखेचे मुख्य कार्यालय अधीक्षक हेमंत जाधव आणि ठाकुर्ली येथील सेंट्रलाइज्ड इलेक्ट्रिकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे कार्यालय अधीक्षक संदीप मोकाशी यांच्या नेतृत्वाखाली सीआरएएससीचे पथक ८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत ही मोहीम राबविणार आहे.



**भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश मापरा यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दक्षिण रायगड भाजपचे जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, सरचिटणीस आनंद लाड, सिराज पानसरे, सुभाष पाटील, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी उपाध्यक्ष गौतम जैन आदी.**
(छाया : राज वैशंपायन)

# पाली सब पोस्ट ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यांची पदे रिक्त, सुविधांचा अभाव

## नागरिकांची गैरसोय, कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार



**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील पाली येथील सब पोस्ट ऑफिसमध्ये (उपडाकघर) दोन क्लार्क व पोस्टमन या जागा रिक्त आहेत. परिणामी उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे. तसेच नागरिकांना एका कामासाठी कित्येक तास खोळंबावे लागते. शिवाय अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

पाली सब पोस्ट ऑफिसमधील आधार कार्ड नोंदणी केंद्र अपुऱ्या सेटअपमुळे गेले अनेक महिने बंद पडले आहे. त्यामुळे नागरिकांना आधार कार्ड नोंदणी अपडेट करता येत नाही. येथील जनरेटर मागील दीड वर्षांपासून बंद पडले आहे. त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यानंतर या सब पोस्ट ऑफिसमधील सर्व कामकाज ठप्प होतो. पावसाळ्यात वीजपुरवठा वारंवार खंडित होतो. त्यामुळे नागरिकांची कामे खोळंबू नयेत, यासाठी पाली पोस्ट ऑफिसमध्ये जनरेटरची सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे. येथील जनरेटर लवकर दुरुस्त करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय दळवी यांनी केली आहे.

रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे. अनेक कामांना विलंब लागतो. परिणामी लवकर काम न झाल्याने नागरिकांना एका कामासाठी कित्येक तास खोळंबावे लागते. मनिऑर्डर, स्पीडपोस्ट, पार्सल देणे किंवा घेणे, पोस्ट तिकीट, लिफाफा, पोस्टकार्ड घेणे, पैसे जमा करणे अशा कामांसाठीही वेळ जातो. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र, सेव्हिंग खाती व विविध योजनांचा लाभ मिळतांनादेखील दिरंगाई होते.

**पाली सब पोस्ट ऑफिसमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. टपाल विभागाने याची दखल घेऊन सोयीसुविधा पुरवाव्यात. तसेच रिक्त जागादेखील भरण्यात याव्यात.**
**-दत्तात्रेय दळवी, संस्थापक अध्यक्ष, स्वयंपूर्ण सुधागड संस्था**

# जांभूळवाडी शाळेस संगणक भेट



**कर्जत : बातमीदार**

इंट्रोग्रीन या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैन यांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील जांभुळवाडी येथील प्राथमिक शाळेला संगणक भेट देण्यात आले. त्यासाठी वांगणी येथील ज्ञानकमल शिक्षण संस्थेने पाठपुरावा केला होता.

जांभूळवाडी शाळेमध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमात इंट्रोग्रीन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जैन यांच्या हस्ते शाळेला संगणक भेट देण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत सदस्य गुरुनाथ मुकणे, ज्ञानकमल शिक्षण संस्थेच्या मनीषा बैकर, शाळेचे मुख्याध्यापक अजय ऐनकर, शिक्षक समीर येरुणकर, यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# 'हर घर तिरंगा' जनजागृतीसाठी खोपोलीत उद्या भव्य रॅली



(छाया : विनायक मांडये)

**खोपोली : प्रतिनिधी**

भारताच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने खोपोली नगर परिषदे तर्फे हर घर तिरंगा हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. त्याच्या जनजागृतीसाठी सोमवारी (दि. १) शहराच्या विविध भागात भव्य रॅली काढण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अनुप दूरे यांनी विशेष बैठकीत सांगितले.

या जनजागृती रॅलीच्या पूर्वतयारीसाठी नगर परिषद सभागृहात मुख्याधिकारी अनुप दूरे यांच्या उपस्थितीत आयोजित केलेल्या विशेष बैठकीला माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, सुनील पाटील, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, राजू गायकवाड, माजी नगरसेविका निर्मला शेलार, केविना गायकवाड, ब्राह्मण सभेचे नरेंद्र हर्डीकर, शिव सहकार सेनेचे हरीश काळे, शिळफाटा व्यापारी असोसिएशनचे राजू आभानी, भाजपचे शहर सरचिटणीस हेमंत नांदे, हास्य क्लबचे अध्यक्ष कुलवंत सिंग, जगदीश मरागजे यांच्यासह नगर परिषद अधिकारी व शिक्षक उपस्थित होते.

या भव्य रॅलीत शहरातील सर्व शाळाचे विद्यार्थी, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती मुख्याधिकारी अनुप दुरे यांनी या वेळी दिली. हे अभियान सर्वांनी यशस्वी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

## निवडक

### अनधिकृत बांधकामांवर कारवाई



**नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागांतर्गत कोरखैरणे सेक्टर १८ येथील अवैध बांधकामाबद्दल नोटीस बजावण्यात आली होती. त्यांनी महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतरित्या बांधकाम चालू केले होते. त्याचप्रमाणे अनधिकृत पावसाळी शेड वर कारवाई करून हे शेड हटविण्यात आलेले आहे. अनधिकृत बांधकामापोटी रक्कम १० हजार रुपये अशी एकूण रक्कम २० हजार रुपये इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. या धडक मोहिमेसाठी कोपरखैरणे विभागाकडील अधिकारी व कर्मचारी, न.मुं.म.पा पोलीस पथक व पाच मजूर, एक गॅस कटर, दोन ब्रेकर व जनरेटर, पीकअप वाहनाचा वापर करण्यात आला.

### परांजपे महाराजांचा शताब्दी जन्मोत्सव



**पनवेल :** शहरातील श्री स्वामी समर्थ (मठ) मंदिर, गावदेवी पाडा येथे सद्गुरू श्री नाना महाराज परांजपे यांचा शताब्दी जन्मउत्सव सोहळा स्वामी सेवकांनी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाद्वारे झाला. यानिमित्ताने नामस्मरण सोहळा, श्री स्वामी समर्थ महिला मंडळाचे भजन, श्री स्वामी समर्थ सहस्त्रनामावली, जन्मउत्सव सोहळा तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप शास्त्रकार अभिषेक, प्रवचन व महाआरती गुरुवर्य मठाधिपती प.पु. सुधाकर (भाऊ) घरत यांच्या मार्गदर्शनाखाली झाले.

### इस्त्राईल तलावात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहरातील इस्त्राईल तलावात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळला असून याबाबत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत व्यक्तीचे वर्णन अंदाजे वय २५ ते ३० वर्ष, अंगाने सडपातळ, अंगात नेसुन काळा फुल शर्ट व निळसर जीन्स पॅन्ट असून त्याचा इस्त्राईल तलावाच्या पाण्यात पडुन मयत झाला आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक अनिल राजुरे यांच्याशी संपर्क साधावा.

# नवी मुंबईत मलेरिया, डेंग्यू फोफावतोय

## प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे लक्ष देण्याची सूचना



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेल्या आठवड्याभरापासून पावसाने काही प्रमाणात उघडीप घेतली असून साचलेल्या पाण्यात डास अंडी घालत असल्याने हा काळ डास उत्पत्तीच्या दृष्टीने जोखमीचा आहे, हे लक्षात घेऊन डास उत्पत्ती स्थानांचा शोध घेणे व ती नष्ट करणे या मोहिमा अधिक काळजीपूर्वक राबविण्याचे निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आरोग्य विभागास दिले. तसेच, पावसाळी कालावधीतील साथरोग तसेच मलेरिया, डेंग्यू, स्वाइन फ्लू यांसारख्या आजारांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांकडे लक्ष देण्याच्याही सूचना त्यांनी केल्या.

आयुक्तांनी घेतलेल्या आरोग्य विभागाच्या बैठकीत अतिरिक्त आयुक्त संजय काकडे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. धनवंती घाडगे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण उपस्थित होते. ज्या परिसरात मलेरिया, डेंग्यूचे रुग्ण आढळले आहेत, अशी नागरी आरोग्य केंद्रनिहाय विभागणी करावी व त्यानुसार कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे. मागील दोन वर्षांतील आकडेवारीचा तुलनात्मक अभ्यास करून जेथे रुग्ण आढळत आहेत, त्या भागांकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. तसेच, डास उत्पत्तीच्या दृष्टीने जोखमीच्या असणाऱ्या बांधकाम साइट्सकडेही अधिक काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले.

मोठ्या सोसायट्यांमधून डास उत्पत्तीस्थाने शोधासाठी येणाऱ्या महापालिका कर्मचाऱ्यांना प्रतिबंध केला जातो. या अनुषंगाने शोधमोहिमेसाठी सोसायट्यांमध्ये जाण्यापूर्वी तेथील अध्यक्ष अथवा सचिव यांना कळवून जावे व जाताना शोध पथकामध्ये शक्यतो




एक तरी महिला कर्मचारी असावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या. तर, प्रवेश नाकारणाऱ्या सोसायट्यांवर सामाजिक आरोग्यविषयक कार्यवाहीला बाधा आणल्याने दंडात्मक कारवाई करण्यात यावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले. महापालिकेच्या वाशी रुग्णालयात मलेरिया व डेंग्यू रुग्णांवरील उपचारांकरिता वेगळा कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. तसेच, डेंग्यूच्या आजारामध्ये प्लेटलेट्सची रुग्णांना भासणारी गरज महापालिकेमार्फत पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करावी, प्लेटलेट्ससाठी आवश्यक असणारी मशीन महापालिकेची स्वत:ची असावी, असेही आयुक्तांनी निर्देशित केले. डेंग्यू व मलेरियाप्रमाणेच स्वाइन फ्लूचे रुग्णही आढळत असून त्याच्या लक्षणांविषयी तसेच, तो होऊ नये म्हणून घ्यावयाच्या खबरदारीविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

> **नवी मुंबई महापालिकेच्या वतीने मलेरिया, डेंग्यू व स्वाइन फ्लूच्या प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात असून नागरिकांनी डासांची निर्मिती होऊ नये म्हणून घर व परिसरात कुठेही पाणी साचू न देण्याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच, डास उत्पत्तीस्थाने शोधण्यासाठी अथवा रासायनिक फवारणीसाठी घरी, सोसायटी, वसाहतीत येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना संपूर्ण सहकार्य करावे.**
> **–अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

## गुंतवणुकीचे आमिष दाखवून पैसे उकळले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नोकरीच्या शोधात असलेल्या एका व्यक्तीला भामट्याने गुंतवणुकीचे आमिष दाखवून त्याला तीन लाख ३० हजार रुपये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्याची आर्थिक फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. कामोठे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव भरतकुमार भानुशाली (वय ४७) असे असून ते वर्षभरापूर्वी कामोठे सेक्टर ८मध्ये राहण्यास होते. त्यावेळी ते इंटरनेटवरून नोकरीच्या शोधात असताना, त्यांना एक जाहिरात निदर्शनास आली होती. या जाहिरातीमधील व्हॉट्सअॅप नंबरवर भानुशाली यांनी संपर्क साधून फ्लिपकार्ट कंपनीतील नोकरीसंदर्भात विचारणा केली होती. त्यावेळी प्रकाश नाव सांगणाऱ्या समोरील व्यक्तीने त्याच्या वेबसाइटवरील वस्तूंमध्ये रक्कम गुंतवल्यास त्यांना गुंतविलेली रक्कम व कमिशन मिळेल, असे सांगितले. त्यानंतर प्रकाशने त्यांना 'मेरी जॉब डॉट कॉम' कंपनीची लिंक पाठवून त्यात माहिती भरून २३८ रुपये भरण्यास सांगितले. त्यांनी माहिती व रक्कम भरल्यानंतर त्यांच्या खात्यात ३६५ रुपये जमा झाले. त्यामुळे भानुशाली यांनी या अॅपमध्ये ९५०० रुपये भरल्यानंतर प्रकाशने त्यांच्या खात्यात १० हजार ८०० रुपये पाठवले.

यानंतर प्रकाशने भानुशाली यांना 'फोया जॉब डॉट कॉम' वेबसाइटची लिंक पाठवून त्यात पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले. त्यामुळे भानुशाली यांनी या अॅपमध्ये ३ लाख ३० हजार रुपये गुंतविल्यानंतर प्रकाशने भानुशाली यांच्या खात्यात एक रुपयाही पाठवला नाही.

## सीबीडीत ३०० किलो प्लास्टिक जप्त

### एक लाखाचा दंड वसूल



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईत प्लास्टिक, थर्माकोलच्या वापरावर बंदी असूनही प्लास्टिक पिशव्यांचा वापर सुरू आहे. सीबीडी विभाग कार्यालयाने विभागात दुकानांमध्ये छापे टाकले. यात तब्बल ३०० किलो प्लास्टिकच्या पिशव्या जप्त करण्यात आल्या व एक लाख रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

पालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर व पिशव्या ठेवणाऱ्या दुकानदारांवर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार बेलापूर कार्यक्षेत्रात घनकचरा विभागाचे उपायुक्त राजळे व सहाय्यक आयुक्त मिताली संचेती यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात आली.

या वेळी विभाग कार्यालयातील सर्व स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता अधिकारी, अतिक्रमण अधिकारी, कर्मचारी यांच्याद्वारे सिंगल युज प्लास्टिक विरोधी दंडात्मक कारवाईची मोहीम राबविण्यात आली. एकुण ३०० किलो प्रतिबंधात्मक प्लॅस्टिक जमा करण्यात आले.

१ जुलै २०२२पासून केंद्र शासनाने सिंगल युज प्लास्टिकवर पूर्णतः बंदी घातलेली आहे. संपुर्ण सीबीडी विभाग प्लास्टिक मुक्त करण्यासाठी यापुढेसुध्दा अशाच प्रकारच्या कारवाया सुरू राहणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर न करता कापडी पिशव्या वापरांवर भर द्यावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

## विश्वनिकेतन महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा परिसरातील कुंभीवलीनजीकच्या प्रयोगशील विश्वनिकेतन तंत्रज्ञान संकुलातील अभियांत्रिकी, वास्तुरचना तसेच डिझाईन महाविद्यालयातर्फे डिप्लोमा व बारावीनंतरच्या विद्यार्थ्यांसाठी नजीकच्या भविष्यातील करिअरच्या विविध संधी या संकल्पनेवर करिअर मार्गदर्शन शिबिर पार पडले. कॉन्टेक्स्ट उपक्रमशील तथा विश्वनिकेतनतर्फे करीअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी ख्यातनाम संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले यांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करीत पुढील दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमास संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. संदीप इनामदार प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या मेळाव्यात अच्युत गोडबोले यांचे भविष्यातील नोकरी व्यवसाय अन् जीवनशैली याविषयावर आयोजित करण्यात आले होते. डॉ. संदीप इनामदार यांचे नाविन्यपूर्ण शिक्षणपद्धती या विषयांवर मादर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. रागिणी मिश्रा यांनी केले तर आभार प्रदर्शन विश्वनिकेतन संकुलाच्या विश्वस्त डॉ. अपर्णा भिरंगी यांनी केले. या वेळी संगणक तज्ज्ञ अच्युत गोडबोले व विश्वनिकेतन संकुलाचे उपाध्यक्ष डॉ. संदीप इनामदार, प्राचार्य डॉ. बी आर पाटील, प्राचार्या सुचेता मॅथ्यूज उपस्थित होते. तसेच डॉ. विकास गायकवाड, प्रा. ए. बी. पवार, प्रा. सुनीता जाधव आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची संकल्पना विश्वनिकेतन संकुलाचे उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ अभियांत्रिकी शिक्षणतज्ज्ञ डॉ. संदीप इनामदार यांची असून सचिव सुनील बांगर, विश्वस्त डॉ. अपर्णा भिरंगी, प्राचार्य डॉ बी आर पाटील, प्राचार्या सुचेता मॅथ्यूज यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. नियोजनाची व संयोजनाची जबाबदारी उपप्राचार्य डॉ. एस वी. कदम आणि दीप्ती सालोखे यांच्या सहकारीवर्गाने पार पाडली.

### बिद्रे हत्याकांडाची सुनावणी ५ ऑगस्टला

**खारघर :** अश्विनी बिद्रे हत्याकांडाची सुनावणी पनवेल सत्र न्यायालयात न्यायमूर्ती के. जी पढेलवार याच्या कोर्टात सुरू आहे. २९ जुलै रोजीची सुनावणी साक्षीदार रोशन बंगेरा गैरहजर राहिल्याने पुढे ढकलण्यात आली. बिद्रे हत्याकांडातील सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. सायबर तज्ञ बंगेरा यांनी हत्याकांडातील मुख्य आरोपी अभय कुरुंदकर व अश्विनी बिद्रे यांच्यातील संभाषण, व्हिडीओ मोबाइल, लॅपटॉपमधून रिकव्हर केल्याने अनेक महत्त्वपूर्ण बाबी समोर आल्या आहेत. त्यामुळे बंगेरा यांची साक्ष महत्त्वपूर्ण मानली जात आहे. प्रकृतीच्या कारणास्तव गैरहजेरी राहिल्याचे कारण बंगेरा यांनी दिल्याचे सरकारी वकील अॅड. घरत यांनी सांगितले. बंगेरा यांना न्यायालयाने समन्स बजावले असून पुढील सुनावणी ५ ऑगस्ट रोजी होणार आहे.

## नवी मुंबई परिवहन कर्मचाऱ्यांच्या मागण्या सोडविण्यासंदर्भात चर्चा



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका कर्मचारी कामगार सेनेची परिवहन कर्मचारी यांच्या मागण्या सोडवण्या संदर्भात परिवहन व्यवस्थापक यांच्याशी मुख्यमंत्री शिंदे समर्थक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली चर्चा. या वेळी कर्मचाऱ्यांच्या मागण्या सोडवण्यासंदर्भात व्यवस्थापक योगेश कडूस्कर यांनी सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे सांगितले.

पर्यावरण समाघात प्राधिकरण महाराष्ट्र राज्य अध्यक्ष तथा मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे सभापती व मुख्यमंत्री शिंदे समर्थक शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या सूचनेनुसार शिवसेना उपशहर प्रमुख कामगार नेते प्रदीप बी. वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबई महानगरपालिका ठोक मानधन कर्मचारी व रोजंदारी कर्मचारी वाहक व चालक यांच्या अडचणी दूर करण्याच्या संदर्भात परिवहन व्यवस्थापक योगेश कडूस्कर साहेब यांची नुकतीच शिष्टमंडळाच्या वतीने भेट घेतली.

या भेटीदरम्यान कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या सोडवण्या संदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान अनेक मागण्या समजून घेत कडूस्कर यांनी त्या मागण्या सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेण्याचे मान्य केले व काही मागणी येणाऱ्या काळात मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

परिवहन व्यवस्थापक कडूस्कर यांना भेटण्यासाठी कर्मचारी कामगार सेनेचे कामगार नेते प्रदीप बी. वाघमारे यांच्या समवेत महादेव गोरे, मनोज गायकवाड, शहाजी डबडे, दिनेश अहिरराव, राजू लांडगे, अमोल वाघमारे इत्यादी युनियनचे कर्मचारी उपस्थित झाले होते.



## नवी मुंबई स्टुडंट्स अॅण्ड युथ फाऊंडेशनतर्फे वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई स्टुडंट्स अॅण्ड युथ फाऊंडेशनच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त माजी नगरसेवक दशरथ भगत यांच्या मार्गदर्शनातून तसेच कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामधील राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या विशेष सहकार्याने वाशी येथील सिडको एक्सिबिशनच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले.

फक्त वृक्षारोपण करून नाही तर त्या रोपांची काळजी घेण्याचे आश्वासनसुद्धा नवी मुंबई स्टुडंट्स अॅण्ड युथ फाऊंडेशन आणि एन. एस. एस. च्या स्वयंसेवकानी दिले.

या वेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी डॉ. एल. व्ही. गवळी, तसेच युवा नेते निशांत भगत, सामाजिक कार्यकर्ते संदीप भगत व नवी मुंबई स्टुडंट्स अॅण्ड युथ फाऊंडेशनचे सदस्य तसेच एनएसएसचे स्वयंसेवक उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिकेकडून कुटुंब नियोजनासंदर्भात जनजागृती


**खारघर : प्रतिनिधी**

प्रसूतीनंतर २४ तासांत तांबी (पीपीआययुसीडी) बसविल्यास तीन वर्षे पाळणा लांबविता येतो. सर्व शासकीय रुग्णालयांत ही सेवा मोफत उपलब्ध आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात देखील पालिका प्रशासन जिल्हा आरोग्य प्रशासनासोबत समन्वय साधुन जनजागृती करीत आहे.

उपजिल्हा रुग्णालयात १८९ महिलांना तांबी बसविण्यात आली आहे तर खाजगी रुग्णालयात ४०१ महिलांना असे पालिका क्षेत्रात ५९० महिलांना तांबी बसविण्यात आली आहे. गर्भवती महिलांच्या आरोग्य, भविष्याच्या दृष्टीने तांबीचे महत्व मोठे आहे.त्यामुळे शासनाच्या वतीने याकरिता जनजागृती केली जात आहे.

प्रसूतीनंतर १० मिनिटांनंतर आणि ४८ तासांच्या आत तांबी बसवता येते. पालिका क्षेत्रात ५९० महिलांनी तांबी (पीपीआययुसीडी) बसवून घेतली आहे. पाळणा लांबविण्यासाठी तांबीचा वापर सुरक्षित असतो. प्रसुतीपश्चात बसविण्यात येणारी तांबी हे अन्य गर्भनिरोधाकापैकी एक सुरक्षित गर्भनिरोधक आहे. या व्यतिरिक्त शासनातर्फे मालाडी, छाया, ही गर्भनिरोधके मोफत उपलब्ध करून दिली जातात. तांबी बसविल्यास शासनातर्फे ३०० रुपये प्रोत्साहन भत्ता लाभार्थ्यास दिला जातो, तर बसविणाऱ्यास १५० रुपये दिले जातात.

> **पाळणा लांबविण्यासाठी तांबीचा वापर सुरक्षित असतो. दोन बाळात अंतर आल्याने मातेचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.आईचे बाळाकडे लक्ष राहिल्याने ते बाळदेखील सुदृढ होते.**
> **–डॉ. आनंद गोसावी, मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल महापालिका**



# एक्स्प्रेस वेवर खालापूरजवळ शिवशाही बस कंटेनरला धडकली





**सहा प्रवासी जखमी**

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

राज्य परिवहन विभागाची शिवशाही बस पुढील कंटेनरला धडकून बसमधील सहा प्रवासी जखमी झाले आहेत. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर टोलनाका येथे शनिवारी (दि. ३०) सकाळी हा अपघात घडला.

एक्स्प्रेस वेने मुंबईहून पुण्याकडे निघालेली शिवशाही बस ११च्या सुमारास खालापूर टोल नाका येथे आली. समोर वाहने असतानाही अत्यंत वेगात ही बस होती. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही बस पुढील कंटेनरला धडकली. या अपघातात बसमधील सहा प्रवासी जखमी झाले आहेत. यात दोन महिला व एक लहान मुलीचाही समावेश आहे.

अपघात होताच टोलनाक्यावर असलेले कर्मचारी आणि सुरक्षा यंत्रणा मदतीसाठी धावली. जखमी प्रवाशांवर प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी खालापूर व खोपोली येथील रुग्णालयात नेण्यात आले. दरम्यान, अपघातामुळे एक्स्प्रेस वेवर काही वेळ वाहतूक कोंडी झाली होती. अपघातग्रस्त बस आपत्कालीन यंत्रणांनी क्रेनच्या मदतीने बाजूला घेतल्यानंतर वाहतूक सुरळीत झाली.

## बूस्टर लसीकरणाला कर्जतमध्ये प्रतिसाद

**कर्जत : बातमीदार**

भाजप किसान मोर्चाचे राज्य सचिव सुनील गोगटे यांच्या कर्जत विठ्ठलनगर येथील जनसंपर्क कार्यालयात कोविड बूस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला. शिबिरात १०० हुन अधिक जणांचे लसीकरण करण्यात आले.

कर्जत भाजप आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने कोविड बूस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सुनील गोगटे यांच्या जनसंपर्क कार्यालयात घेण्यात आलेल्या या शिबिरात ८० जणांना कोविशिल्ड तर २० जणांना कोव्हॅक्सिन बूस्टर डोस देण्यात आले. डॉ. संगीता दळवी, आरोग्य सेविका शिल्पा जाधव, नगर परिषदेचा संकेत पाटील, विजय भगत यांनी बूस्टर डोस लसीकरण करून घेतले.

या वेळी सुनील गोगटे, भाजप कर्जत तालुका सरचिटणीस संजय कराळे, नगरसेवक बळवंत घुमरे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपचा नागरिकांसाठी कोरोना प्रतिबंधक उपक्रम



## प्रवाशांना होतोय स्लीपर, शिवशाही गाड्यांचा भार

### श्रीवर्धन एसटी आगारात १५ एसटी बस वाढविण्याची मागणी

**म्हसळा : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या श्रीवर्धन आगाराकडून साध्या एसटी (लालपरी) बसगाड्यांच्या मार्गावर वातानुकूलित (शिवशाही), शयनयान (स्लीपर) गाड्या चालविण्यात येत आहेत. त्यांचे तिकीट दर जास्त असल्यामुळे ग्रामिण भागातील सर्वसामान्य प्रवाशांना नाहक भूर्दंड सहन करावा लागत आहे.

एसटीच्या श्रीवर्धन आगारांतून विविध ५० मार्गावर प्रवाशांसाठी बससेवा पुरवल्या जात आहेत. त्यामध्ये वातानुकूलित, शयनयान, लालपरी गाड्यांचा समावेश आहे. त्यामध्ये श्रीवर्धन आणि म्हसळा तालुक्यातील २३ तसेच मुंबई, बोरीवली, नालासोपारा, ठाणे, पुणे, सातारा, लातूर, मिरज या अंतरजिल्हा किंवा शहरी मार्गावरील किमान २७ फेऱ्यांचा समावेश आहे. त्यासाठी पाच शिवशाही, आठ शयनयान (स्लीपर) आणि ४४ साध्या गाड्यांचा वापर केला जातो. मात्र साध्या गाड्यांच्या तुलनेत शिवशाही आणि शयनयान (स्लीपर) बसचे तिकीट दर ५०ते ६० टक्क्यांनी जास्त असल्याने श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील सर्वसामान्य प्रवाशांना आर्थिक फटका बसत आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या रायगड विभागातील आठ आगारांतून ३९शिवशाही, आठ शयनयान (स्लीपर) आणि ३२८ साध्या बस धावतात. रायगड विभागांसाठी असलेल्या आठ शयनयान (स्लीपर) बसचा भार श्रीवर्धन डेपोवर आहे. रायगड विभाग एसटीच्या ताफ्यातील शिवशाही व शयनयान (स्लीपर) बसमुळे एसटीचे भारमान कमी झाले असून, रायगड विभाग एसटीचा संचित तोटासुद्धा प्रचंड वाढत आहे. त्यामुळे एकेकाळी आर्थिकदृष्ट्या नफ्यांत असणारा एसटीचा रायगड विभाग आणि श्रीवर्धन आगार नुकसानीत येत आहे. श्रीवर्धन आगारातील ३ते४ शिवशाही आणि ६ते ७शयनयान (स्लीपर) बस कमी करून साध्या गाड्या वाढवाव्या अशी मागणी श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातून करण्यात येत आहे.

**श्रीवर्धन-मुंबई मार्गावरील तिकिटाचे दर**

१) शिवशाही : ४१५रुपये
२) स्लीपर : ३८०रुपये
३) लालपरी : २८०रुपये



**राज्य परिवहन विभागाने रायगड विभागांसाठी मंजूर असलेल्या आठ शयनयान (स्लीपर) बस वापराचा भार श्रीवर्धन डेपोवर टाकल्याने लालपरीच्या मार्गावर स्लीपर बस चालविली जाते. हा श्रीवर्धन -म्हसळा तालुक्यातील प्रवाशांवर अन्याय आहे.**

**-अनिल महामुनकर, एसटी प्रवासी वाहतूक संघटना, देवधर, ता. म्हसळा**

## आरपीएफने सहा महिन्यांत परत केले प्रवाशांचे १.८९ कोटींचे सामान

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ)च्या कर्मचाऱ्यांनी गेल्या सहा महिन्यात ६८९ प्रवाशांचे सुमारे १.८९ कोटी रुपयांचे हरवलेले किंवा मागे राहिलेले मौल्यवान सामान परत मिळवून दिले आहे.

रेल्वेच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी आरपीएफचे कर्मचारी चोवीस तास जागरुक असतात. त्याव्यतिरिक्त अमानत या ऑपरेशन अंतर्गत आरपीएफने गरजू प्रवाशांना त्यांचे हरवलेले किंवा मागे राहिलेले सामान, मोबाइल फोन, लॅपटॉप, दागिने, रोख रक्कम यासारख्या मौल्यवान वस्तू प्रवाशांना परत मिळवून दिल्या आहेत. जानेवारी ते जून २०२२ दरम्यान, ऑपरेशन 'अमानत' या मोहिमेअंतर्गत, आरपीएफने ६८९ पैकी ३५४ प्रवाशांचे १.१७ कोटी रुपयांचे सामान एकट्या मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात परत मिळविले. तर भुसावळ विभागातील १४३ प्रवाशांचे रु.२८.१९ लाख, नागपूर विभागात ८१ प्रवाशांचे रु. १९.१४ लाख, पुणे विभागात ७३ प्रवाशांचे रु.१५.०४ लाख आणि सोलापूर विभागातील ३८ प्रवाशांचे रु.९.३८ लाख किमतीचे मौल्यवान सामान प्रवाशांना परत मिळवून दिले आहे.

## कर्जतमधील चिंचवलीत वृक्षारोपण

**कर्जत : बातमीदार**

विश्वकर्मा सुवर्णकार समाज-मुंबई या संस्थेच्या युवामंचचे रौप्यमहोत्सवी वर्ष असून त्यानिमित्ताने कर्जत तालुक्यातील चिंचवली ग्रामपंचायत हद्दीमध्ये ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच एकसळ गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या पहिली ते चौथीमधील विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या. या वेळी हेमंत कोंडिलकर यांनी सेंद्रिय खताचा वापर कसा करावा, सेंद्रिय खतामुळे होणारे फायदे याबाबत माहिती दिली.

चिंचवली ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनीता अहिर, उपसरपंच स्वाती बोराडे, माजी उपसरपंच ऋषिकेश भागात, भाजपचे कार्यकर्ते राजेश भगत, ग्रामविकास अधिकारी सूरज मुकादम यांच्यासह विश्वकर्मा सुवर्णकार समाजाचे अध्यक्ष श्रीधर सागवेकर, सरचिटणीस मोहन नगरकर, संस्थेचे माजी अध्यक्ष आणि विश्वकर्मा पंचाल सुवर्णकार महासंघ सरचिटणीस सदानंद नगरकर, संस्थेचे उपाध्यक्ष उदय सागवेकर, उपाध्यक्ष सुनील सागवेकर, सहचिटणीस अशोक पालकर, माजी अध्यक्ष विलास वाडेकर, माजी अध्यक्ष आत्माराम देवरुखकर, विश्वकर्मा सुवर्णकार सहकारी पतपेढी (मर्या.)चे अध्यक्ष मनोहर पालकर, युवा मंच अध्यक्ष गणेश सागवेकर, सरचिटणीस अतुल देवरुखकर, सहचिटणीस संकेत नगरकर, कार्यध्यक्ष प्रसाद चिखलकर, मंगेश रमेश पालकर, खजिनदार ओमकार सागवेकर यांच्यासह विद्यार्थी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

(छाया : संतोष पेरणे)



## माणगावात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार | कुणबी समाज साले ग्रुपचा पुढाकार

**माणगाव : प्रतिनिधी**

कुणबी समाज साले ग्रुप तर्फे समाजातील दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी (दि. ३०) माणगाव येथील कुणबी भवन सभागृहात सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी खूप अभ्यास करून आपल्या आई वडिलांबरोबरच समाजाचे नाव उज्वल करावे, असे आवाहन कुणबी समाज विकास मंडळाचे माणगाव तालुका अध्यक्ष महादेवराव बक्कम यांनी या वेळी केले.

विद्यार्थ्यांनी ध्येय्य नजरेसमोर ठेवून शिक्षण घ्यावे. व समाजासाठी काम करायला पुढे यावे, असे प्रतिपादन साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांनी केले. या वेळी दहावी, बारावीच्या परीक्षेत ६०टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या समाजातील १५० विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

विघवली शाळेचे शिक्षक कृष्णा पानावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे उपाध्यक्ष शैलेश भोनकर, सरचिटणीस शांताराम भोरावकर, खजिनदार रामभाऊ टेंबे, सदस्य बाळाराम नवगणे, गंगाराम उभारे, माणगाव पंचायत समिती माजी सभापती संगीता बक्कम, माणगाव तालुका कुणबी समाज महिला संघटना अध्यक्ष नीता करकरे, साले ग्रुपचे उपाध्यक्ष टिकम भोनकर, सुभाष गुगळे, काशीराम पाखुर्डे, सरचिटणीस सखाराम खरंगटे, सहचिटणीस रवींद्र अर्बन, काशीराम पवार, सुधाकर पालकर, नामदेव खराडे, सखाराम जाधव, राजेंद्र जाधव, पारुनाथ मुंढे, कृष्णा पानावकर, काशीराम लहाने, नथुराम मोरे आदींसह समाजबांधव ,विद्यार्थी व पालक या गुणगौरव सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## ऑक्सिजन बँक आपल्या दारी!

### कोस्ते खुर्द शाळेने राबविला उपक्रम



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोस्ते खुर्द येथील प्राथमिक शाळेने गुरुवारी (दि. २८) तुळस बाग (ऑक्सिजन बँक) आपल्या दारी हा उपक्रम राबविला. या वेळी विद्यार्थ्यांना ऑक्सीजन म्हणजेच प्राणवायूचे महत्त्व आणि प्राणवायूच्या नैसर्गिक स्त्रोतांची माहिती देण्यात आली.

प्राणवायूची खाण असलेली तुळस प्रत्येकाच्या दारी असावी तसेच ती प्रत्येक शाळेसमोरही असावी ही संकल्पना समोर ठेवून कोस्ते खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत गुरुवारी ऑक्सिजन बाग आमच्या दारी हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थी आणि शिक्षकांनी प्रत्येकी दोन तुळशीची रोपे आणून ऑक्सिजन बाग तयार केली. सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका भानुप्रिया मेथा, उपशिक्षक जितेंद्र सावंत, उपशिक्षिका मंजिरी खराडे, उपक्रमशील शिक्षिका मधुरा पालांडे यांनी विशेष प्रयत्न केले.

**तुळस ही प्राणवायूचा मोठे स्त्रोत आहे. पावसाळी दिवसांत तुळशीची रोपे मोठ्या प्रमाणात मिळतात. ही रोपे घरासमोर, बागेत लावल्यास हिरवाई बरोबर प्राणवायूही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. हवेचे प्रदूषण काही अंशी कमी होईल. या हेतूने शाळेत तुळस बाग उपक्रम राबविला.**

**-भानुप्रिया मेथा, मुख्याध्यापिका, प्राथमिक शाळा, कोस्ते खुर्द, ता. माणगाव**

## कर्जतमध्ये रानभाज्यांना वाढती मागणी

**आयुर्वेदिक गुणधर्मामुळे ग्राहकांची पसंती**

**कर्जत : बातमीदार**


डोंगर, दऱ्यांमुळे कर्जतच्या जंगल भागात मोठ्या प्रमाणात रानभाज्या आढळून येतात. पावसाळ्यात सहज उपलब्ध होणाऱ्या या रानभाज्यांना आयुर्वेदिक दृष्ट्या मोठे महत्त्व आहे. सध्या प्रामुख्याने आदिवासी महिला या रानभाज्या बाजारात मोठ्या प्रमाणात येत असून त्या खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल दिसून येत आहे.

सध्याच्या सेंद्रिय खातापासून पिकवलेल्या भाजीपाल्याना मोठी मागणी आहे. त्यात नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या रानभाज्या यादेखील ग्राहकांच्या पसंतीला उतरल्या आहेत. या रानभाज्यांसाठी कोणतही खत किंवा कीटकनाशक वापरले जात नाही. पावसाळ्यात पूर्णपणे नैसर्गिक पद्धतीने उगवलेल्या या रानभाज्या खवय्यांसाठी पर्वणीच असते.

कर्जत तालुक्यातील जंगलात कंटोली, कुलू, दिंडा, कुरड, भारंगा, शेवळा, कवळा, आघाडा, माळा, कई, मोरंगी, काटेसावर, नारई, बागोटी, टाकळा, आंबाडी, भोकर, खडकतेरी, भोवरी, माठ, काटेमाठ, आदी रानभाज्या आढळतात. तालुक्यातील आदिवासी या रानभाज्या कर्जत, कशेळे, नेरळ, कडाव येथील बाजारपेठेत विक्रीसाठी आणत आहेत. त्या खरेदी करण्यासाठी ग्राहकांच्या उड्या पडत आहेत. आरोग्यवर्धक असलेल्या या रानभाज्यांची मागणीही वाढत आहे.







## पेणमध्ये आज पत्रकारांसाठी मोफत आरोग्य शिबिर

**पेण : प्रतिनिधी**

गॅलेक्सी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल, पत्रकार उत्कर्ष समिती, पेण प्रेस क्लब आणि श्री समर्थ क्लिनिकल लॅब-पेण यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ३१) सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत पत्रकार व त्यांच्या कुटुंबातील महिला सदस्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

सदर शिबिरामध्ये जनरल हेल्थ चेकअप तसेच डोळे, रक्तदाब, ईसीजी, ब्लडशुगर, सीबीसी, लघवी आदी तपासण्या मोफत करण्यात येणार आहेत. पेण, खालापूर व अलिबाग तालुक्यामधील सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबियांनी या शिबिरात आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. रत्नदीप गवळी यांनी केले आहे.

## आंदोशी येथील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

### अलिबाग फोटोग्राफर्स व मेडिकल असोसिएशनतर्फे शिबिर

अलिबाग : प्रतिनिधी

अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन आणि अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आंदोशी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५६ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

वरंडे ग्रुपग्रामपंचायतीचे सरपंच सुधीर चेरकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश गवळी, सचिव डॉ. प्रणाली पाटील, डॉ. राजाराम हुलवन, डॉ. मनीष म्हात्रे, डॉ. अनिकेत पाटील यांनी या शिबिरात विद्यार्थ्यांची कान, नाक, घसा, छाती, पोट, हृदयाचे ठोके, रक्त प्रमाण, दातांची तपासणी करून मोफत औषधे दिली.

रायगड फोटोग्राफर्स अँड व्हिडीओग्राफर्स असोसिएशनचे खजिनदार जितेंद्र मेहता, शाळेचे मुख्याध्यापक सुनिल थळे, बेलोशी हायस्कुलचे चेअरमन प्रकाश खडपे, शाळा कमिटी अध्यक्ष मंदार पाटील, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष समीर मालोदे, उपाध्यक्ष तुषार थळे, खजिनदार राकेश दर्पे, ज्येष्ठ छायाचित्रकार सुरेश खडपे, सदस्य महेश कांबळी, अतुल वर्तक, संतोष पाटील, विवेक पाटील, सुबोध घरत, अभिजित काटकर, शिक्षक राजेंद्र पाटील, संध्या पाटील, प्रियांका भोईर व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.



# भारताकडून घानाचा धुव्वा

## राष्ट्रकुल स्पर्धेत महिला हॉकी संघाची शानदार सुरुवात

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल स्पर्धेत भारतीय महिला हॉकी संघाने शानदार सुरुवात करीत पहिल्याच सामन्यात घानाचा ५-० असा पराभव केला. भारताकडून गुरजीत कौरने सर्वाधिक दोन गोल केले, तर नेहा गोयल, संगीता कुमारी आणि सलीमा टेटे यांनी प्रत्येकी एक गोल केला.

भारतीय महिला हॉकी संघ यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत १६ वर्षांचा पदकांचा दुष्काळ संपवण्याचे ध्येय ठेवून मैदानात उतरला आहे.



इंग्लंड, कॅनडा, वेल्स आणि घानासह भारत अ गटात आहे.

भारतीय महिला हॉकी संघाने २००६मध्ये राष्ट्रकुल स्पर्धेत आपले शेवटचे पदक जिंकले होते. मेलबर्नमध्ये रौप्यपदक जिंकल्यानंतर महिला हॉकी संघाला एकही पदक मिळालेले नाही. गोल्ड कोस्टमध्ये (२०१८), भारतीय संघ चौथ्या स्थानावर राहिला होता. नुकत्याच झालेल्या विश्वचषकातही भारत नवव्या स्थानावर होता पण गेल्या वर्षी झालेल्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारतीय महिला चौथ्या स्थानावर राहिल्या होत्या. त्यामुळे त्यांचे मनोबल वाढलेले आहे. पुढील सामन्यातही विजयी मालिका कायम ठेवणे अपेक्षित आहे.

# बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारताची विजयी सलामी

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारताच्या खुल्या आणि महिला विभागांतील सहाही संघांनी बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत विजयी सलामी दिली. भारताची अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीने पहिल्याच दिवशी रोमहर्षक सरशी साधली.



खुल्या विभागात भारताच्या 'अ' संघाने ९४व्या मानांकित झिम्बाब्वेला ४-० अशी धूळ चारली. विदित गुजराथीने मकोटो रॉडवेलला ४९ चालींमध्ये पराभूत केले. अर्जुन इरिगेसीने ऑफलाइन ऑलिम्पियाड स्पर्धेत पदार्पणात मसान्गो स्पेन्सरला ३८ चालींमध्ये नमवले. एसएल नारायणन आणि के. शशिकिरण यांनीही विजयारंभ करताना अनुक्रमे एमराल्ड मुशोरे आणि जेमुसे झेम्बा यांना पराभूत केले.

भारतीय 'ब' संघाने संयुक्त अरब अमिराती, तर 'क' संघाने दक्षिण सुदान संघांचे आव्हान परतवून लावले. 'ब' संघातील डी. गुकेशला संघर्ष करावा लागला, मात्र त्याने ओमरान अल होसानीवर मात केली. तत्पूर्वी रौनक साधवानीने अल ताहेर अब्दुलरहमान मोहम्मदला नमवत 'ब' संघाचा सर्वांत पहिला विजय नोंदवला होता. बी. अधिबननेही आपला सामना जिंकला. निहाल सरिनने इब्राहिम सुल्तानला ६२ चालींमध्ये पराभूत करण्याची कामगिरी केली. भारताच्या 'क' संघाकडून अभिजीत गुप्ता, मुरली कार्तिकेयन, एस. पी. सेतुरामन आणि अभिमन्यू पुराणिक यांनी विजय मिळवले.

महिला गटातील भारताच्या 'अ' संघाने ताजिकिस्तानचा पराभव केला. भारताची तारांकित खेळाडू कोनेरू हम्पीने पहिल्या पटावर ४१ चालींमध्ये नादेझदा ॲन्टोनोव्हानेवर सरशी साधली. आर. वैशाली आणि भक्ती कुलकर्णी यांनी अनुक्रमे सब्रिना अबरोरोव्हा आणि होटामी यांना पराभूत केले. तानिया सचदेवने रुखशोना सायदोव्हाला १०३ चालींमध्ये हरविले. 'ब' संघाने वेल्स, तर 'क' संघाने हाँगकाँगचा ४-० असा धुव्वा उडवला.

# भारतीय बॅडमिंटन संघाकडून पाकिस्तानचा पाडाव

**बर्मिंगहॅम** : राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय बॅडमिंटन संघाने मिश्र सांघिक प्रकारात पाकिस्तानचा ५-० असा पराभव केला. अलेक्झांडर स्टेडियमच्या नॅशनल एक्झिबिशन केंद्रावर खेळल्या गेलेल्या सामन्यांमध्ये भारतीय बॅडमिंटनपटूंनी चमकदार कामगिरी केली.

एकेरी सामन्यात भारताच्या पी. व्ही. सिंधूने पाकिस्तानच्या महूर शहजादचा २१-७, २१-६ असा पराभव केला. त्यानंतर महिला दुहेरीमध्ये भारताच्या गायत्री गोपीचंद आणि त्रिशा जॉली यांनी शानदार खेळ केला. या दोघींनी महूर शहजाद आणि गजाला सिद्दिकी जोडीचा २१-४, २१-५ असा पराभव केला.

पुरुष दुहेरीत सात्विक साईराज व चिराग शेट्टी यांनी मुहम्मद इरफान सईद भाटी आणि मुराद अली यांचा २१-१२, २१-९ असा पराभव केला. मिश्र दुहेरीमध्ये अश्विनी पोनप्पा आणि बी सुमित रेड्डी या भारतीय जोडीने पाकिस्तानच्या मोहम्मद भाटी आणि गजाला सिद्दीकीचा पराभव केला.

तत्पूर्वी पुरुष एकेरीमध्ये भारताच्या किदाम्बी श्रीकांतने पाकिस्तानच्या मोहम्मद अलीचा २१-७, २१-१२ असा सरळ गेममध्ये पराभव केला.

# टेबल टेनिसपटू मनिका विजयी

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या दिवशी भारताची तारांकित टेबल टेनिसपटू मनिका बत्राने विजयी श्रीगणेशा केला. मनिकाने दक्षिण आफ्रिकेच्या मुशफिकुह कलामवर ११-५, ११-३, ११-२ असा विजय मिळवला. यासह भारताने दक्षिण आफ्रिकेवर २-० अशी आघाडी घेतली आहे.



भारतीय खेळाडू मनिका बत्राने पहिल्या गेममध्ये मुशफिकुह कलामचा ११-५ अशा फरकाने पराभव केला. पहिल्या गेममध्ये तिने प्रतिस्पर्धी खेळाडूवर पूर्णपणे वर्चस्व गाजवले. दुसऱ्या गेममध्येही मनिकाने कलामला एकही संधी दिली नाही. हा गेमही तिने एकतर्फी जिंकला. मनिकाच्या विजयी सुरुवातीमुळे भारतीय टेबल टेनिस संघाचा आत्मविश्वास वाढला आहे.

मनिका बत्राची राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमधील कामगिरी चांगली आहे. आतापर्यंत राष्ट्रकुल स्पर्धेत तीने दोन सुवर्णांसह एकूण चार पदके जिंकलेली आहेत. याशिवाय तिने आशियाई क्रीडा स्पर्धेत मिश्र दुहेरीतही कांस्यपदक पटकावलेले आहे. ऑलिम्पिकच्या एकेरी स्पर्धेत तिसरी फेरी गाठणारी मनिका ही एकमेव भारतीय महिला खेळाडू आहे. तिने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ही कामगिरी केली होती.

### वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप

# पाकच्या पराभवामुळे भारत तिसऱ्या स्थानी

**दुबई : वृत्तससंस्था**

पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील दुसरा कसोटी सामना श्रीलंकेने २४६ धावांनी जिंकला. श्रीलंकेच्या या विजयाबरोबरच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉईंट टेबलमध्ये मोठा बदल झाला आहे. दारूण पराभवामुळे पाकिस्तान आता गुणतालिकेत पाचव्या स्थानावर फेकला गेला आहे, तर भारत चौथ्या स्थानावर आला आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्या गुणांमध्ये फारसा फरक नाही. भारताची जिंकण्याची टक्केवारी ५२.०८, तर पाकिस्तानची ५१.८५ इतकी आहे. सध्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत दक्षिण आफ्रिका ७१.४३ पॉईंट घेऊन पहिल्या स्थानावर विराजमान आहे, तर ऑस्ट्रेलिया ७० गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे.






# टी-२०मध्येही भारताची विजयी सलामी

## विंडीजचा ६८ धावांनी पराभव

**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

एकदिवसीय मालिकेत यजमान वेस्ट इंडिजला व्हॉइटवॉश दिल्यानंतर भारतीय क्रिकेट संघाने टी-२०मालिकेतही विजयी श्रीगणेशा केला. पहिल्या सामन्यात भारताने विंडीजचा ६८ धावांच्या फरकाने पराभव केला. त्यामुळे पाच सामन्यांच्या मालिकेत भारताला १-० अशी आघाडी मिळाली आहे.



प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित २० षटकांमध्ये सहा गड्यांच्या बदल्यात १९० धावा केल्या होत्या. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या विंडीजच्या सलामीवीरांनी पहिल्या दोन षटकांमध्ये जोरदार फटकेबाजी सुरू केली होती, मात्र तिसऱ्या षटकामध्ये अर्शदीप सिंगने कायले मेयर्सला बाद करून यजमानांना पहिला धक्का दिला. त्यानंतर ठराविक अंतराने विंडीचे गडी बाद होत गेले. शामराह ब्रूक्सने केलेल्या २० धावा ही वेस्ट इंडीजच्या डावातील सर्वोच्च धावसंख्या ठरली. भारताकडून अर्शदीप सिंग, रवी बिश्नोई आणि रविचंद्रन अश्विन यांनी प्रत्येकी दोन, तर भुवनेश्वर कुमार आणि रवींद्र जडेजाने प्रत्येकी एक गडी बाद केला.

या सामन्यात विंडीजने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे भारताला प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरावे लागले. प्रथम फलंदाजी करताना भारताने निर्धारित २० षटकांमध्ये सहा गड्यांच्या बदल्यात १९० धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनी डावाची सुरुवात केली होती. सूर्यकुमार २४ धावा करून बाद झाला. त्यानंतर आलेले श्रेयस अय्यर (०), ऋषभ पंत (१४), हार्दिक पांड्या (१), रवींद्र जडेजा (१६) विशेष कामगिरी करू शकले नाही.

या दरम्यान कर्णधार रोहितने ४४ चेंडूंत ६४ धावांची अर्धशतकीय खेळी केली. अशी कामगिरी करून तो पुन्हा टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे. त्याने न्यूझीलंडच्या मार्टिन गुप्टिलला मागे टाकले आहे. रोहित बाद झाल्यानंतर दिनेश कार्तिकने भारताचा डाव सावरला. त्याने केवळ १९ चेंडूंमध्ये ४१ धावा फटकावल्या. त्याला सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.






# आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंचे मतदानाचे हक्क अबाधित

*'एमसीए' सदस्यांच्या घटनादुरुस्तीची चर्चा लांबणीवर*

**मुंबई : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंचे मुंबई क्रिकेट संघटनेतील (एमसीए) मतदानाचे हक्क शाबूत राहिले असून 'एमसीए' सदस्यांच्या विशेष सर्वसाधारण सभेत घटनादुरुस्तीबाबतची चर्चा पुढे ढकलण्यात आली.

लोढा समितीच्या शिफारशींनंतर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार भारतीय क्रिकेट नियामक मंडळाशी (बीसीसीआय) संलग्न सर्व राज्य क्रिकेट मंडळांना आपल्या घटनेत बदल करावा लागला होता. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूंनी आपले सहयोगी सदस्य असावे, पण त्यांना मतदानाचा अधिकार नसावा, अशी एमसीएमधील काही सदस्यांची धारणा आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com